रायगड, शनिवार, दि. ८ जून २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹



● (छायाचित्र : समीर मालोदे)

# कृषीवलच्या वर्धापनदिनाला मराठी साज

**| अलिबाग | प्रतिनिधी | जिल्हाभरातील दिग्गजांची मांदियाळी... शुभेच्छांचा आणि अभिनंदनाचा वर्षाव... मान्सूननं आगमनाची वर्दी दिल्यानं भरुन आलेले आभाळ.. अशा आल्हाददायक अन् उत्साही वातावरणाच्या सोबतीला 'मिस आणि मिसेस 'कृषीवल' स्पर्धेचा जल्लोषपूर्ण माहोल... अशा भारावलेल्या वातावरणात दैनिक 'कृषीवल'चा ८८ वा वर्धापन दिन शुक्रवारी (दि. ७ जून) उत्साहात साजरा झाला. या कार्यक्रमाला मराठी सिनेअभिनेत्री सई ताम्हणकरची उपस्थिती कार्यक्रमाचे आकर्षण ठरली. विविध क्षेत्रातील मान्यवरही कार्यक्रमास हजेरी लावली होती. सर्वसामान्य वाचकांशी जोडल्या गेलेल्या दैनिक 'कृषीवल'च्या ऋणानुबंधांची यानिमित्ताने प्रचिती आली. यानिमित्ताने सहभागी झालेल्या स्पर्धकांनी केलेल्या वेशभूषेत मराठमोळ्या संस्कृतीचा साज पाहावयास मिळाला.**

रायगड जिल्ह्यातील दीन-दलित, कष्टकरी, शेतकरी, अन्याय-अत्याचारग्रस्त, वंचितांचा आवाज ठरलेल्या दैनिक कृषीवलचा ८८ वा वर्धापन दिन सोहळा अलिबाग शहरातील क्षात्रैक्य समाज हॉल, कुरुळ येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास कृषीवलच्या सल्लागार संचालक सुप्रिया पाटील, व्यवस्थापकीय संचालक चित्रलेखा पाटील, कार्यकारी संपादक माधवी सावंत, सल्लागार संपादक प्रसाद केरकर, आरडीसीसी बँकेचे माजी पान २ वर

(अधिकचे वृत्त उद्याच्या अंकात)



● सिनेअभिनेत्री सई ताम्हणकर यांचा सन्मान करताना कृषीवलच्या सल्लागार संचालक सुप्रिया पाटील. सोबत व्यवस्थापकीय संचालक चित्रलेखा पाटील, कोरिओग्राफर जयेश पाटील.



## कलागुणांना वाव

महिलांच्या विकासात आणि सक्षमीकरणात कृषीवल नेहमीच खंबीरपणे उभा राहिला आहे. प्रत्येक क्षेत्रातील महिलांना कृषीवलने साथ दिली आहे. त्यांच्या उपजत कलागुणांना वाव देण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन त्यांना नावलौकिक मिळवून दिला आहे. याचीच प्रचिती आजच्या मिस आणि मिसेस कृषीवल स्पर्धेच्या माध्यमातून उपस्थितांना आली. या स्पर्धेला अलिबाग शहारातील स्पर्धकांनी मोठा प्रतिसाद दिला.

## जिल्हाभरातील मान्यवरांकडून शुभेच्छा

स्वर्गीय नारायण नागू पाटील यांनी कृषीवलची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या विचारांचा हा वारसा स्व. प्रभाकर पाटलांनी चालवला. तोच आता आ. जयंत पाटील, माजी आ. पंडित पाटील, सौ. सुप्रिया पाटील, नृपाल पाटील, चित्रलेखा पाटील यांनी चालवला आहे. आज वर्धापनदिनानिमित्त कृषीवलच्या चौथ्या पिढीच्या वारसदारांना शुभेच्छा देण्यासाठी जिल्हाभरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी गर्दी केली होती. व्यवस्थापकीय संचालक चित्रलेखा पाटील यांनी उपस्थितांच्या शुभेच्छांचा स्वीकार केला आणि त्याबद्दल आभारही मानले. शुभेच्छा देण्यासाठी आलेल्या नागरिकांनी चित्रलेखा पाटील यांच्याशी संवाद साधताना समाजाच्या प्रश्नांसाठी कृषीवलने दिलेल्या योगदानाची आवर्जून आठवण करुन दिली.

**आजचा अग्रलेख**
**संघाचे पोस्टमन**

## वेधक

### रेपो रेट जैसे थे

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीनंतर रेपो दरात कपात करण्यात येईल आणि कर्जाचा हप्ता कमी होईल, अशी आशा सर्वसामान्यांना होती. मात्र, या आशांवर पाणी फेरले गेले असून, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने शुक्रवारी नवीन पतधोरण जाहीर करताना रेपो दरात कोणताही बदल केला नाही. आरबीआयने सलग आठव्यांदा रेपो दर जैसे थे ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे रेपो दर ६.५ टक्क्यांवर स्थिर आहे. पतधोरण समितीच्या बैठकीमध्ये हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती आरबीआयचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी दिली. त्यामुळे सर्वसामान्यांना व्याजदरात कोणताही दिलासा मिळालेला नाही. भारताची अर्थव्यवस्था उत्तम असून, सध्या महागाई आणि वाढीदरम्यान संतुलन ठेवण्यावर आमचे लक्ष केंद्रित आहे. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये जीडीपी वाढीचा दर ७ टक्क्यांवरून ७.२ टक्क्यांवर राहण्याचा अंदाज आहे, असे शक्तिकांत दास म्हणाले.

### पावसाचा इशारा

**पुणे :** गेल्या काही दिवसांपासून गोव्यात रखडलेला मान्सून अखेर गुरुवारी दुपारी महाराष्ट्रात दाखल झाला. दरम्यान, शुक्रवारी (दि.७ जून) मान्सून तळकोकण ओलांडून पुढे सरकला आहे. दरम्यान, पुढील पाच दिवस संपूर्ण महाराष्ट्र, महाराष्ट्राची किनारपट्टी आणि उत्तर कर्नाटकात मुसळधार पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. पुढील दोन दिवसांत उत्तर-पश्चिम भारतात काही ठिकाणी गडगडाटी वादळे आणि पाऊस सुरू राहण्याची शक्यता आहे, असा अंदाजदेखील भारतीय हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे. मान्सूनची आगेकूच सुरूच असून, शनिवार (९ जून) ते रविवारपर्यंत (दि.१० जून) तो मुंबईत दाखल होण्याची शक्यता आहे.

# डगर हैं मुश्किल कठिन सफर हैं

## महाडमध्ये तटकरे अपेक्षीत मताधिक्यापासून दूर

**आविष्कार देसाई**
**| रायगड |**

महाड विधानसभा मतदार संघातून २० हजारांचे मताधिक्य देण्याची वल्गना शिंदे गटाचे आमदार भरत गोगावले यांनी केली होती, मात्र प्रत्यक्षात फक्त तीन हजार ६१६ एवढेचे मताधिक्य महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांना देऊ शकले आहेत. यातून एक गोष्ट स्पष्ट होते की, शिंदे गट येथे सुमारे १६ हजार मतांनी मागे पडला आहे. तसेच तटकरेंना येथे अपेक्षीत मताधिक्य न मिळाल्याने आगामी होणाऱ्या विधानसभेला ते गोगावलेंना मदत करणार का असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे गोगावलेंची पुढील राजकीय वाटचाल सोपी नसल्याचे बोलले जाते.



राज्यातील सत्तेत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट सामील झाल्याने गोगाले यांच्या मंत्री पदावर गंडातर आले होते. दोन वेळा त्यांना मंत्रीपदाती हुलकावणी मिळाली, परंतू मागून सत्तेत सहभागी झालेल्या राष्ट्रवादीतील आदिती तटकरे यांची वर्णी थेट कॅबीनेट मंत्रीपदी झाल्याने गोगावले समर्थकांची तळपायाची आग मस्तकात गेली होती. पुढे मंत्री पद पदरात पडेल अशी भाबडी आशा गोगावले अद्यापही बाळगून आहेत.

महायुतीच्या माध्यमातून रायगड लोकसभेसाठी सुनील तटकरेंना उमेदवारी दिल्याने गोगावले यांना तटकरे यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणे क्रमप्राप्त झाले. तटकरे यांच्यामुळेच मंत्रीपद हुकले होते. त्यांचाच प्रचार करण्याची वेळ गोगावले यांच्यावर आली. तटकरे यांना ४० हजारांचे मताधिक्य देण्याचे गोगावले यांनी बोलून दाखवले होते. त्या बदल्यात विधानसभेच्या निवडणूकीत आम्हाला मदत करा, असेही ते म्हणाले होते. मतदान पार पडल्यावर पान २ वर

# ओमकारचा मारेकरी मोकाट

## धारदार चाकूने हल्ला; पोलिसांकडून माहिती देण्यास टाळाटाळ

**| पेण | प्रतिनिधी |**

ओमकार म्हात्रे या तरुणावर कल्पेश बोरेकर नामक गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीने चाकूहल्ला करून त्याला मृत्यूशयावर पाडले आहे. ओमकारचा अपराध हाच की, पेणमधील स्वयंघोषित पत्रकार रस्त्याच्या कडेला पडलेला पाहून त्याला दवाखान्यात पोहोच केले. त्याला दवाखान्यात पोहोच केले या रागातून कल्पेश याने ओमकारवर धारदार चाकूने पोटात व छातीवर वार केले. हे वार एवढे जोराचे होते की,



**माझ्या मुलाचा दोष काय?**

**माझ्या मुलाने रस्त्याच्याकडेला पडलेल्या माणसाला माणुसकी धर्म समजून दवाखान्याता नेले आणि ॲडमीट केले. हा गुन्हा केला का? त्याची त्याला एवढी मोठी किंमत मोजावी लागली आहे. माझ्या मुलावर ही अवस्था आणणाऱ्या नराधमाला कठोरातली कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी ओमकारच्या आईने केली आहे.**

ओमकार याच्या पोटातील आतडे बाहेर आले. पान २ वर

# शिक्षक, पदवीधर मतदारसंघ वगळून आचारसंहिता संपुष्टात

**| रायगड | प्रतिनिधी**

लोकसभेच्या निवडणुकांसाठी भारत निवडणूक आयोगामार्फत देशभरात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली होती. निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण झाली असून, आदर्श आचारसंहिता संपुष्टात आल्याचे भारत निवडणूक आयोगाने कळविले असल्याची माहिती राज्य मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली.

राज्यात मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक तसेच मुंबई शिक्षक मतदारसंघासाठी निवडणूक जाहीर झाली आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने मुंबई, कोकण आणि नाशिक विभागात आदर्श आचारसंहिता लागू राहणार असल्याचेही मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत स्पष्ट करण्यात आले आहे. देशात सात टप्प्यात मतदान झालं असून, सातवा म्हणजे शेवटचा टप्पा १ जून रोजी संपला. त्यानंतर ४ जून रोजी मतमोजणी होऊन त्याचा निकाल लागला. त्यानंतर आता देशात नवीन सरकार सत्तेत येणार आहे.

# दिघीत वनसंपदेची बेसुमार कत्तल

## तब्बल अडीचशे एकरवर भुईसपाट

- **स्थानिक, वन विभाग प्रशासनाचे 'अर्थ'पूर्ण दुर्लक्ष?**
- **जावेळेतील घटनेने स्थानिकांमध्ये संताप**

**| दिघी | वार्ताहर |**

श्रीवर्धन तालुक्यातील जावेळे येथे बेसुमार वृक्षतोड करण्यात आलेली आहे. सुमारे अडीशे एकरच्या परिसरातील अनेक दुर्मिळ वृक्षांची तोड अजूनही सुरु आहे. या वृक्षतोडीकडे वनखाते व तालुका प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. जमीन मालक ही वृक्षतोड करून जमीन ही एका बलाढ्य कंपनीला विकण्याचा प्रयत्न करत असल्याचे बोलले जाते.

जावेळे परिसरातील जमिनी राजस्थानी व गुजराती व्यक्तींनी अतिशय अल्प प्रमाणात स्थानिक नागरिकांकडून घेतलेल्या आहेत. सद्य:स्थितीत जमिनीचे भाव गगनाला भिडलेले असताना पैशाच्या लोभापोटी जंगले नष्ट केली जात आहेत. यावर्षी तापमानात अमूलाग्र वाढ झालेली आहे. व्यापारी व धनदांडग्या व्यक्तींनी मातीमोल किमतीत जमिनी घेऊन कंपन्यांना सोन्याच्या भावाने विकण्यासाठी ही जंगलतोड करण्यात आलेली आहे का, असा आरोप स्थानिक जनता करत आहे. पान २ वर



### जिल्हाधिकारी कारवाई करणार?

**जंगलतोड करणारी शेतकरी व प्रत्यक्ष जंगलतोडीचे अंमलबजावणी करणाऱ्या ठेकेदाराविरोधात व जंगलतोडीला अभय देणाऱ्या वन खाते प्रशासनातील बाबू लोकांवर जिल्हाधिकारी कारवाई करणार का, हा एक प्रश्न आहे. सर्वसामान्य व्यक्तींनी अनवधानाने व चुकून एखाद्या वृक्षाची तोड केल्यास वन खाते तात्काळ कारवाई करते. मात्र, जावेळे येथे कारवाई कधी होणार, असा प्रश्न विचारला जातोय.**

> जावेळे गावातील जमीनमालकांच्या जागेची स्वच्छता होत आहे. ते आम्हाला मान्य आहे. बाकीचे काही मला माहित नाही.
>
> – मनोहर सावंत, सरपंच, वावेतर्फे श्रीवर्धन

**यंदा आठ दिवस आधीच मिनीट्रेन पावसाळी सुट्टीवर**

# माथेरानची राणी पावसाळी सुट्टीवर

**| नेरळ | संतोष पेरणे |**

पर्यटकांची लाडकी मिनीट्रेन पर्यटनाच्या गर्दीने ओसंडून वाहणार आहे. मात्र, मध्य रेल्वे प्रशासनाने आज नेरळ-माथेरान-नेरळ मिनीट्रेन बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. तर, यंदा आठ दिवस आधीच मिनीट्रेनचा प्रवास थांबणार आहे. दरम्यान, आज आठ जूनपासून मिनीट्रेन पावसाळी सुट्टीवर जात असून, १५ ऑक्टोबरपासून पुन्हा ती सुरू होणार आहे, अशी माहिती मध्य रेल्वेने प्रसिद्ध केलेल्या पत्रकातून दिली आहे.

ब्रिटिश काळात सुरू झालेली मिनीट्रेन दरवर्षी १५ जून ते १५ ऑक्टोबर या कालावधीत बंद ठेवली जाते. पर्वतीय रेल्वे मार्ग असल्याने पावसाचा प्रचंड वेग आणि सततचा पाऊस यामुळे दरवर्षी पावसाळ्यातील चार महिने मिनीट्रेन बंद असते. मात्र, यावर्षी मिनीट्रेन आठ दिवस आधीच म्हणजे आठ जूनपासून पावसाळी सुट्टीवर जाणार आहे. सध्या माथेरानमध्ये पर्यटन हंगाम पान २ वर

> सध्या पाऊस नाही आणि पाऊस सुरु होण्याची चिन्हेदेखील नाहीत. तरीदेखील रेल्वेकडून नेरळ-माथेरान-नेरळ मिनीट्रेन बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय चुकीचा असून, १५ जूनपर्यंत गाडी सुरु ठेवली पाहिजे आणि १५ ऑक्टोबरऐवजी एक ऑक्टोबरपासून मिनीट्रेन सुरु झाली पाहिजे.
>
> – जनार्दन पारटे, सामाजिक कार्यकर्ते

### शटल सेवेचे वेळापत्रक

**माथेरान येथून अमन लॉजकरिता**
०८.२०,०९.१०,११.३५,०२.००, ०३.१५,०५.२०. शनिवार रविवार १०.०५,०१.१०

**अमन लॉज स्थानकातून माथेरान करिता**
०८.४५,०९.३५,१२.००,.०२.४५,० ३.४०,०५.४५
शनिवार रविवार १०.३०,०१.३५



# एनडीएचा सत्तास्थापनेचा दावा

## राष्ट्रपतींना घटक पक्षांच्या समर्थनाचे पत्र सुपूर्द

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेणार आहेत. एनडीएकडून शुक्रवारी सरकार स्थापनेचा दावा केला गेला असून, एनडीएमधील घटक पक्षांनी समर्थनाचे पत्र राष्ट्रपतींना सुपूर्द केले आहे. त्यानंतर आता ९ जून रोजी मोदी सरकारचा शपथविधी पार पडणार आहे.

भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वात एनडीएचा नेता म्हणून तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी निवड मोदी यांनी निवड करण्यात आली आहे. मोदी म्हणाले की, पुढील काळात त्यांचे सरकार सुशासन, विकास, जीवनमान आणि किमान गुणवत्ता यावर लक्ष केंद्रित करणार आहे. येत्या दहा वर्षांत सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनावर लक्ष केंद्रित केले जाईल. परस्पर विश्वास हा या आघाडीचा गाभा असून, सर्व पंथ समभाव या तत्त्वाशी ते कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. पान २ वर

# तलावातील कारंजा गेला कुठे?



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्यातील नेरळ ग्रामपंचायतमधील राजमाता जिजामाता तलावातील सर्वांचे आकर्षण असलेला कारंजा गायब झाला आहे. तलावातील पाण्याच्या मध्यभागी असलेला कारंजा गेली काही दिवस दिसेनासा झाला असल्याने हा कारंजा गेला कुठे, असा प्रश्न निर्माण झाला आहे.**

## ■ स्थानिकांचा ग्रामपंचायतीला सवाल

१९९८ मध्ये तत्कालीन सरपंच सावळाराम जाधव यांनी नेरळ ग्रामपंचायतीच्या मालकीच्या तलावाचे सुशोभीकरण केले होते. त्यावेळी तलावातील सर्व गाळ माती काढून तलाव खोल करण्यात आले आणि नंतर तलावाच्या मध्यभागी कारंजा बसविण्यात आला होता. राजमाता जिजामाता तलाव असे नामकरण करण्यात आलेल्या या तलावात दोन वर्षांनी खासगी व्यक्तींच्या माध्यमातून बोटिंगची व्यवस्था करण्यात आली. त्यानंतर तलावातील पाण्यात मध्यभागी असलेला कारंजा आणि त्या कारंजाचे आजूबाजूने करता येणारी पाण्यातून सैर यामुळे नेरळ गावातील ग्रामपंचायत तलाव नेरळकरांचे आकर्षण बनले होते.

राजमाता जिजामाता तलाव ग्रामपंचायतीचे मानांकन बनल्याने या ठिकाणी तलावातील गाळ काढण्याचे आणि तलाव सुशोभीकरण आदी कामे करण्याची परवानगी डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानाकडून घेण्यात आली. प्रतिष्ठानच्या माध्यमातून ग्रामपंचायतीमधील तलावाचे सुशोभीकरण, त्यात बसण्यासाठी आकर्षक बैठक व्यवस्था, आजूबाजूला लोखंडी रेलिंग तसेच भित्ती फलक प्रवेशद्वारावर उभारण्यात आला आहे. तर, नावाची पाटी नेरळ ग्रामपंचायतीकडून लावण्यात आली. अशा राजमाता जिजामाता तलावाचे आकर्षण असलेला पाण्याच्या मध्यभागी असलेला कारंजा गेली काही दिवस दिसेनासा झाला आहे. त्यात तलावातील पाण्याचा उपसाकरून कारंजा काढण्यात आला असल्याचे दिसून येत आहे.

कारंजा काढून टाकण्याबाबत ग्रामपंचायतीमध्ये कोणताही ठराव घेण्यात आलेला नाही. त्यामुळे राजमाता जिजामाता तलावातील कारंजा गेला कुठे, चोरी झाला आहे काय, असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे या कारंजाबाबत नेरळ ग्रामपंचायत चोरीचा गुन्हा दाखल करणार काय, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

## नीट परीक्षेत दिक्षाचे यश



**। म्हसळा । वार्ताहर ।**

नॅशनल इलींजीबिलिटी कम एंट्रन्स टेस्ट (युजी) मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल दि.४ जून रोजी लागला. त्यामध्ये म्हसळ्याची दिक्षा नितीन बोरकर हिने ७२० गुणांपैकी ६१७ गुण मिळवून गुणवत्ता यादीत चमकण्याचा मान पटकवीला

शिक्षणाची आवड असणाऱ्या दिक्षा बोरकरने दहावी आणि बारावी परीक्षेतही प्रथम येण्याचा मान मिळविला. मेडिकलला जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी युजी सारखी अवघड परीक्षा देऊन गुणवत्ता यादीत आल्यास मनासारख्या महाविद्यालयात मेडिकलसाठी प्रवेश मिळणे सोपे जाते. म्हसळ्यासारख्या ग्रामिण भागात कोणत्याही प्रकारच्या नीट अथवा अन्य कोणत्याही स्पर्धा परीक्षाच्या क्लासेसची सोय नसतानाही आई-वडील आणि भाऊ यांचे मार्गदर्शन घेऊन फार मोठे यश संपादन केल्याबद्दल तीचे संपूर्ण जिल्ह्यातून विशेष कौतुक होत आहे.

यावेळी सुशील यादव, नगराध्यक्ष संजय कर्णिक, समीर बनकर, गौरव पोतदार, प्रदिप कदम, महेंद्र ढवळे, भालचंद्र करडे, सुनिल अंजर्लेकर, स्वेता बोरकर, नीता बोरकर, नीता ढवळे, प्रकाश करडे, राजेंद्र बोरकर, सरपंच सुरेश महाडिक, मंगेश बोरकर आदि मान्यवर उपस्थित होते.



## संतोष मुसळे सेवानिवृत्त

**। कोलाड । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील गोवे गावचे रहिवाशी संतोष विठ्ठल मुसळे हे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतुन वयोमानानुसार त्यांच्या वयाच्या ५८व्या वर्षी सेवा निवृत्त झाले आहेत. त्यांचा सेवा निवृत्तनिमित्त सत्कार सम रंभ सोहळा विद्युत वितरण कंपनीच्या अलिबाग उपविभागीय कार्यालयात नुकताच संपन्न झाला. संतोष मुसळे यांनी विद्युत वितरण कंपनीमध्ये अनेक वर्षे सेवा केली. रायगड जिल्ह्यातील अनेक तालुक्यात त्यांनी विद्युत वितरण कंपनीत प्रामाणिकपणे काम केली. यावेळी महावितरण कंपनीचे अधिकारी, कर्मचारी वर्ग तसेच संतोष मुसळे यांची पत्नी व परिवार उपस्थित होता.

## बाबा म्हात्रे यांचे निधन

**। खरोशी । प्रतिनिधी ।**



चंद्रकांत रामा म्हात्रे तथा सी.आर. म्हात्रे यांचे वडील रामा पिठू म्हात्रे यांचे वयाच्या ९७व्या वर्षी निधन झाले. सुरवातीच्या काळात वाहन सुविधा नसताना त्यांनी आपली पोस्टमनची नोकरी सन १९७० च्या काळात सायकलने प्रवास करून केली. पत्नीच्या निधनानंतर सुमारे ३२ वर्ष आपल्या कुटुंबासोबत राहिले. एक मनमिळाऊ समाजसेवी वृत्तीमुळे ते सर्वांचे पोस्टमन बाबा होते. त्यांच्या पश्चात पाच मुले, दोन मुली, सूना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांची दशक्रिया विधी व उत्तरकार्य वढाव येथे राहत्या घरी १६ जूनला होणार आहेत.




## वृक्षारोपण करून पर्यावरण दिन साजरा

**। खांब । वार्ताहर ।**

पर्यावरण जनजागृती व संवर्धनासाठी गेली अनेक वर्षे कार्यरत असणाऱ्या ईडब्लूए कंपनीच्यावतीने धाटाव औद्योगिक वसाहतीमधील ॲन्थिया कं. युनीट २ या कंपनीच्या आवारात वृक्षारोपण करून पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी ईडब्लूए कंपनीचे सीईओ लोचन तुपकर, जनरल मॅनेजर अमोल बागडे, निलेश राऊळ व कंपनीचे कर्मचारी वर्ग यांच्यासह सतिष महाले, सुयोग देवकर, जागृती राऊत, मानशी बिरगावळे, महेश तुपकर आदी उपस्थित होते. याच कार्यक्रमाचे औचित्य साधून रोहा-कोलाड मार्गावरील आयडीबीआय बॅंक आणि ब्रेंडा कॉम्लेक्स या रहिवासी संकुल परिसरात देखील वृक्षारोपण करण्यात आले.

## उरण येथे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**। उरण । प्रतिनिधी ।**



पर्यावरण वाचवणे म्हणजे फक्त प्लास्टिक बंदी, वृक्ष लागवड किंवा वाघांचे संरक्षण नसून सभोवताच्या जीवसृष्टी व तिला आवश्यक घटक म्हणजे हवा, पाणी, जमीन, एवनस्पती व पशूपक्षी, कीटक यांचा समतोल म्हणजे पर्यावरण. या मधील प्रत्येक घटक व त्याची दुसऱ्या घटकांसोबतची कडी किंवा संबंध अतिशय महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन डॉ. वैशाली पाटील यांनी केले. डॉ. अंकुर पाटील व लोकमंच मकाम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पर्यावरण दिनाच्या कार्यक्रमात बोलत होत्या.

या कार्यक्रमात तरुण स्वयंसेवकांनी पुढाकार घेऊन विविध फळझाडांची रोपे वाटण्यात आली. अंकुर ट्रस्ट व लोकमंच या संस्थांद्वारे सामूहिक वनाधिकार व त्यामधील व्यवस्थापनाबाबत पेण तालुक्यातील एकूण ४० आदिवासी वाड्यांमध्ये अभियान राबविण्यात येत आहेत. या अभियाने संस्थेचे कार्यकर्ते सोपान निवळकर, नीरा वीर, पायल आंब्रे, मीनल सांडे, आशिष सावंत हे कार्यकर्ते वाड्यांवर जाऊन सहभागी पद्धतीने संसाधनांचे मॅपिंग करून वनहक्क समित्यांस बळकटी देत आहेत. या अभियानाचा एक भाग म्हणून पर्यावरण दिनाच्या निमित्ताने वृक्षाची रोपे हाती घेऊन फेरी काढत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी अंकुर ट्रस्टचे संस्थापक राज पाटील, सुधीर नाईक, शंकर नाईक, एकनाथ वाघमारे, बाळाराम वाघमारे, विशाल नाईक आदी उपस्थित होते.

पान १ वरून

## कृषीवलच्या वर्धापनदिनाला मराठी साज

मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप नाईक, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य द्वारकानाथ नाईक, अलिबागच्या माजी उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, माजी नगरसेविका वृषाली ठोसर, शेकाप महिला आघाडीच्या तालुका प्रमुख प्रीती पाटील, रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, नागाव सरपंच हर्षदा मयेकर, माजी सरपंच निखिल मयेकर, आक्षी सरपंच रश्मी पाटील, कृषीवलचे वरिष्ठ संपादक आविष्कार देसाई, सहाय्यक संपादक सुयोग आंग्रे, कृषीवलचे व्यवस्थापक रुपेश पाटील, जाहिरात व्यवस्थापिका हर्षा पाटील व संपादकीय, जाहिरात विभाग, वितरण, बायडिंग विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

## डगर है मुश्किल बड़ा कठिन सफर है

मतदानाचा टक्का घसरल्याने किमान २० हजारांचे मताधिक्य तरी देऊ, असे गोगावले समर्थकांनी सांगितले होते.

आता मतदान यंत्र उघडल्यावर प्रत्यक्षात फक्त तीन हजार ६१६ एवढेच मताधिक्य तटकरेंना मिळाले आहे. विशेष म्हणजे महाड शहर आणि खाडी पट्ट्यात देखील तटकरेंना पाहीजे तसे मताधिक्य मिळाले नाही. येथील सच्च्या शिवसैनिकांनी कोणत्याही सोयी-सुविधा नसताना रक्ताचे पाणी करुन गीतेंचा प्रचार केला. मतदारांना मतदान केंद्रापर्यंत घेऊन आले. याचे श्रेय महाडमधील शिवसनेच्या प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांला नक्कीच जाते.

मतदार संघातील निजामपूरमध्ये तटकरे हे गीतें पेक्षा सुमारे सहा हजार मतांनी पुढे राहीले. महाड विधानसभा मतदार संघावर वर्चस्व असणाऱ्या गोगावलेंची मदत तटकरेंसाठी फारच तोकडी पडल्याचे आकडेवारीवरुन दिसते. तटकरे आता त्यांना पडलेली मते पाहून आगामी विधानसभेच्या निवडणूकीत गोगावले यांना मदत करणार का असा प्रश्न निर्माण झाला आहे. गोगावलेंची पुढील राजकीय वाटचाल थोडी अवघडच राहणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. गोगावले स्वतःला कसे निभावून नेणार, यातून ते कसे आत्मपरिक्षण करणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## माथेरानची राणी पावसाळी सुट्टीवर

असून, पर्यटकांची हजारोंची गर्दी माथेरानमध्ये आहे. असे असताना मध्य रेल्वे प्रशासनाने हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजानुसार, मिनी ट्रेनची नेरळ-माथेरान-नेरळ सेवा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आज नेरळ माथेरान नेरळ मार्गावर चालविली जाणारी प्रवासी वाहतूक या हंगामातील शेवटची ट्रेन असणार आहे. सध्या सर्वत्र कडक उन्हामुळे अंगाची लाही लाही होत असताना थंड हवेचा आस्वाद घेण्यासाठी पर्यटकांची गर्दी माथेरान शहरात आहे. त्यात माथेरान आणि मिनीट्रेन हे मोठे समीकरण असून, मिनी ट्रेनची सेवा बंद करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतल्याने त्याचा थेट परिणाम माथेरानचे पर्यटन व्यवसायावर होणार आहे.

गतवर्षी मिनी ट्रेनची सेवा १० जून रोजी स्थगित करण्यात आली होती. तर पावसाळी हंगाम १५ ऑक्टोबर रोजी सुरू होण्याची अपेक्षा असताना २४ डिसेंबर २०२३ रोजी मिनी ट्रेनची वाहतूक सेवा दोन महिने उशिरा सुरू झाली होती. यावर्षीदेखील आठ दिवस आधीच मिनी ट्रेनची प्रवासी वाहतूक बंद करण्यात येत आहे. सध्या कर्जत, नेरळ, माथेरान येथे कडक उन असून उष्यामुळे अंगाची लाहीलाही सुरू आहे आणि असे असताना हवामान खात्याने दिलेल्या सूचनेनुसार मिनी ट्रेनची नेरळ माथेरान नेरळ प्रवासी वाहतूक बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आल्याने प्रवासी पर्यटक यांनी नाराजी व्यक्त केली आहे. मात्र, या काळात नेरळ माथेरान मार्गावरील शटल सेवा कोणत्याही अडथळ्याविना सुरू राहणार आहे. अमन लॉज ते माथेरान या दरम्यान मिनी ट्रेनची शटल सेवा सुरू असते आणि त्या शटल सेवेच्या फेऱ्या पावसाळ्यातदेखील कायम ठेवण्यात येणार आहे. नेरळ माथेरान नेरळ मार्गावर प्रवासी वाहतूक बंद असली तरी नेरळ येथून दररोज मालवाहू गाडी सकाळी साडेआठ वाजता माथेरान अमन लॉज येथे सोडली जाणार आहे, अशी माहिती मध्य रेल्वेने प्रसारित केलेल्या पत्रकातून दिली आहे.

## ओमकारचा मारेकरी मोकाट

ही सर्व घटना पेण जिल्हा उपरूग्णालय पेण येथे झाली. त्यावेळी उपरूग्णालयातील सीसीटीव्ही सुरू होते, तसेच ऑन ड्युटी पोलीसदेखील होते. परंतु, एवढा मोठा हल्ला होत असताना पोलिसांनी बघ्याची भूमिका घेतली. याबाबत पूर्ण पेण शहरात उलटसुलट चर्चा सुरू आहे.

याविषयी ओमकारचा भाऊ संकेत याने दिलेल्या फिर्यादीनुसार, ओमकार हा वाघ नामक व्यक्तीच्या वाढदिवसाच्या पार्टीसाठी गेला होता. पार्टीवरून येत असताना रस्त्याच्या कडेला स्वयंघोषित पत्रकार सुभाष टेंबे हा पडलेल्या अवस्थेत त्याला दिसला. म्हणून त्याने त्याला पेण जिल्हा उपरुग्णालयात दाखल केले. तेथे दारूच्या नशेत कल्पेश आला आणि त्याने ओमकारला विचारणा केली, सुभाष टेंबेला दवाखान्यात का आणलास? यावरून ओमकार आणि कल्पेश यांच्यात बाचाबाची झाली आणि कल्पेश याने धारदार चाकूने ओमकारवर वार केले. त्याच्याबरोबर आणखी त्याचे साथीदार होते. जर घटना पहाटे तीन वाजता होते, तर त्याचा गुन्हा रात्री १०.३० वाजता नोंद होतोय, हे योग्य आहे का? ज्याच्यावर हल्ला झालाय तो धोक्याची पातळी पार करून मृत्यूशी झुंज देतोय. असे असताना नातेवाईक गुन्हा नोंदवायला आले नाही म्हणून गुन्हा नोंदविण्यास दिरंगाई करणे किती योग्य आहे. त्यातच घटनास्थळी असलेल्या पोलीस कर्मचाऱ्याची जाबाबदारी नव्हती का? की स्वतःहून झालेल्या घटनेची खबर पोलीस ठाण्यात देऊन गुन्हा नोंद करणे व आरोपीला ताब्यात घेणे. मात्र, असे न होता खाकीकडून आरोपीला पळण्यास वाव दिल्यासारखे झाले, अशी चर्चा होत आहे. एवढे सर्व करूनसुद्धा आरोपी सरेआम सांगत होता मला राग आला म्हणून मी त्यावर चाकूचे वार केले. या वृत्तीला राक्षसी वृत्तीच म्हणावी लागेल. तरी उशिरा का होईना, पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या गुन्ह्याचा अधिक तपास पेण पोलीस करीत आहेत.

महिला पत्रकारांना पोलिसांकडून उर्मट उत्तरे

गर्जा रायगड आणि दैनिक कृषीवलच्या महिला प्रतिनिधी जिल्हा उप रुग्णालयात झालेल्या घटनेची माहिती घेण्यासाठी ५ जून रोजी सायंकाळी ५.३० वाजता पेण पोलीस ठाण्यात गेल्या होत्या. यावेळी पोलीस कर्मचारी डोकले यांनी झालेल्या घटनेची माहिती तर दिलीच नाही, उलट सांगितलं की गुन्हा नोंद झालेला नाही, तुम्ही खोटी माहिती छापू नका, आज कर्मचारी उपलब्ध नाहीत, त्यामुळे गुन्हा नोंद नाही. ओमकार दवाखान्यात व्यवस्थित आहे, तुम्ही काळजी करू नका हे असे बोलणे पोलीस कर्मचाऱ्याला किती योग्य आहे? ते ही महिला प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी.

## दिघीत वन संपदेची बेसुमार कत्तल

वन खाते प्रशासनाकडून २५० पेक्षा जास्त एकरावरील वृक्षांची तोड करण्याची परवानगी संबंधित जमीन मालकास कुणी दिली, हा प्रश्न आहे. जंगलतोड झाल्यानंतर निर्माण झालेला लाकूडफाटा कोणत्या व्यावसायिकांनी विकत घेतला, याबद्दल अद्याप माहिती मिळालेले नाही. या जंगलतोडीमध्ये सर्वसामान्य वृक्षांसोबत खैर, साग व इतर दुर्मिळ वृक्षांचासुद्धा समावेश आहे.

**सर्वांची चिडीचूप**

**जावेळे गावातील एकरमधील जमिनीवर वृक्षतोड होत असताना स्थानिक ग्रामस्थांनी कुणीही आवाज उठवलेला नाही. जंगल तोड करणाऱ्या शेतकऱ्यांनी तालुका प्रशासनातील अधिकारी आणि वन खाते यांच्याशी समन्वय साधत अतिशय शांततेत सदरची जंगलतोड केलेली आहे. पर्यावरणप्रेमींकडून सदरच्या जंगलतोडीवर तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.**

**पर्यावरण संतुलन बिघडणार**

**वृक्षतोड होत असलेल्या सर्व जमिनी भोगवटा वर्ग एक किंवा भोगवटा वर्ग दोन आहेत. सदरच्या जमिनीवरती कोणत्याही स्वरूपाचे पीक घेतले जात नाही. मात्र, पर्यावरणाच्या संतुलनाच्या दृष्टिकोनातून जंगलांची भूमिका अनन्यसाधारण आहे. सदरची जंगलतोड भविष्यातील संकटाची चाहूल ठरू शकते. यापूर्वीच सीआरझेडमध्ये अतिक्रमण केलेल्या व अनधिकृतरित्या बांधकाम केलेल्या व्यावसायिकांचा मुद्दा गाजत असताना सदरच्या जंगलतोड करणाऱ्या सर्व व्यक्तीविरोधात तात्काळ कारवाई होणे अपेक्षित आहे.**

**वनखात्याची भूमिका संशयास्पद**

**जावेळे वृक्षतोडीबाबत वनक्षेत्रपाल संजय पांढरकामे यांच्याशी बोलले असता ते काही दिवस रजेवर असल्याचे सांगितले. मात्र, वृक्षतोड ही गेल्या काही महिन्यांपासून सुरु आहे. अतिरिक्त कार्यभार असलेले वनखात्याचे सुधाकर थळे यांनी अर्ज करा, मग माहिती देतो असे बोलून अधिक बोलायचे टाळलं.**

## एनडीएचा सत्तास्थापनेचा दावा

आज झालेल्या एनडीएच्या बैठकीत तेलुगु देसम पक्षाचे (टीडीपी) एन चंद्राबाबू नायडू, जनता दल (युनायटेड)चे नितीश कुमार, शिवसेनेचे एकनाथ शिंदे, लोक जनशक्ती पक्षाचे (रामविलास) चिराग पासवान, जनता दल (एस)चे एचडी कुमारस्वामी, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अजित पवार, अपना दल (एस) च्या अनुप्रिया पटेल, जनसेना पक्षाचे पवन कल्याण आणि भाजपचे नवनिर्वाचित सदस्य आणि एनडीएच्या इतर मित्रपक्षांनी सहभाग घेतला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा शपथविधी ९ जून रोजी संध्याकाळी ६.३० वाजता राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात होणार आहे. या शपथविधीसाठी अनेक देशाचे प्रमुख देखील उपस्थित राहणार असल्याची माहिती मिळत आहे.

## वन विभागातर्फे पर्यावरणदिन साजरा

**। कोर्लई । वार्ताहर ।**



शासनाच्या वन विभागातर्फे मुरुड व रोहा तालुक्यातील चणेरा येथे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रियांका पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक पर्यावरणदिन साजरा करण्यात आला.

पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी जागतिक पर्यावरण दिवशी वेगवेगळे पर्यावरण विषयक जागरूकता आणि कृती कार्यक्रम आयोजित केले जातात. जागतिक पर्यावरण दिवशी त्या गोष्टीबद्दल जागरूक केले जाते. हा दिवस पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन करण्याच्या आपल्या जबाबदारीचे आपल्याला जाणीव आणि दृष्टिकोन देतो. याचाच भाग मुरुड तसेच रोहा तालुक्यातील चणेरा येथे यादिवशी वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी वनविभागाचे चणेरा येथील वनपाल आर.जी. गायकवाड, गोविंद खेडकर, त्रिभूवन, विलास वाघमारे, संतोष रेवणे, दिलिप पवार, दिनेश रोटकर, अनिल चोरघे व ग्रामस्थ मंडळ उपस्थित होते.

## गुरुकुल शाळेत पर्यावरण दिन साजरा

**। रसायनी । वार्ताहर ।**



जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून चौक येथील श्री स्वामिनारायण गुरुकुल आंतरराष्ट्रीय शाळेत जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. यावेळी श्री स्वामिनारायण गुरुकुल नवी मुंबईचे संचालक परमपूज्य विश्वमंगलदास स्वामीजी यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण दिनाचे महत्त्व सांगून पर्यावरण रक्षणाची जबाबदारी ही सर्वांची आहे. यासंबंधीची जाणीव प्रत्येकाला झाली तर पर्यावरण संवर्धनासाठी ठोस असे कार्य उभे राहू शकेल, असे त्यांनी विदयार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले. या दिवशी शाळेच्या परिसरात अनेक प्रकारच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमात परमपूज्य ब्रम्हस्वरूप स्वामीजी, प्राचार्य डॉ. हरिबाबू रेड्डी, गुरुकुलचे सर्व शिक्षक वर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Re-E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000031369**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-5/2024-2025.**<br>RFx E-tender for Hiring of LMV vehicle for EHV lines Sub-Division Panvel-2 under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2024 to 31.03.2025...**4th call.**<br>**Tender amount Rs. 4,49,946/-,**<br>**EMD amount Rs. 5,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **06.06.2024, 18:00 Hrs. to 13.06.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 13.06.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **14.06.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

**निवडक**

## नातेवाईकांचा शोध सुरू

**पनवेल :** पनवेल जवळील पुष्पक नोड सेक्टर १ येथील एका इमारतीवरुन खाली पडून जखमी होवून मृत्यू झालेल्या इसमाच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. मृत्यू झालेल्या इसमाचा बांधा मध्यम, वय ३० ते ३५ वर्षे, डोक्यावर मध्यम काळे केस, उंची अंदाजे ५ फुट आहे. या इसम ाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दुरध्वनी २७४५२३३३ किंवा सहा.पोलीस निरीक्षक राजेंद्र घेवडेकर यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

## फेऱ्या वाढविण्याची मागणी

**पनवेल :** खांदेश्वर ते पनवेल स्थानकादरम्यान आणखीन एक बस सेवा सुरू झाल्याने प्रवाशी वर्गात आनंदाचे वातावरण आहे. पनवेल रेल्वे स्थानकावरील प्रवाशांच्या वाढत्या गर्दीमुळे बस फेऱ्यांमध्ये वाढ करण्याची मागणी प्रवाशांमधून होत होती. या मागणीचा विचार करून एनएमएमटीने पनवेल ते खांदेश्वर रेल्वे स्थानकादरम्यान आणखीन एक बस वाढविल्याने प्रवाशांना चांगलाच दिलासा मिळालेला आहे. नवीन पनवेलमधून ५९ क्रमांकाची बस पनवेल ते खांदेश्वर स्थानकादरम्यान धावते.

## झाडे लावण्याचा संकल्प

**पनवेल :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शिवनाम फाऊंडेशनच्या वतीने वर्षभरात १००८ झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. संकल्पनेची सुरुवात पनवेल शिवा मोक्षधाम येथे १२ झाडे लावून करण्यात आली. यावेळी उपस्थित शिवनाम संस्थेचे संस्थापक अनिकेत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारी नचिकेत म्हात्रे, डॉ. मृदुल पाटील, एकनाथ चिरके, आर्ची पटेल, निलेश स्वामी, आनंद चौरे, ऋतुजा गडगे, सौरभ वाणी आदी सदस्यांनी उपस्थित राहून वृक्षारोपण केले.

## नाल्यात सापडले मृत अर्भक

**पनवेल :** खांदा कॉलनी सेक्टर ९ प्लॉट नंबर २५ ए येथील नाल्यामध्ये मृत अर्भक सापडल्या प्रकरणी आरोपी विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात भादवि कलम ३१६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. खांदेश्वर पोलिसांना नाल्यामध्ये अर्भक असल्याची माहिती मिळाली. पोलीस त्या ठिकाणी गेले असता नाल्यालगत पूर्ण वाढ न झालेला गर्भ सापडून आला. अज्ञात व्यक्तीने या गर्भ जीवाचा मृत्यू घडवून आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

## सोन्याची चेन खेचली

**पनवेल :** ज्येष्ठ नागरिकाच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून चोरटे पळून गेल्याची घटना कामोठे येथे घडली. दादू निकाळजे हे सेवानिवृत्त असून कामोठे येथे राहतात. विस्टा कॉर्नर या ठिकाणी ते मॉर्निंग वॉकसाठी अक्षर बिल्डिंग समोरील रस्त्यावरून चालत होते. सकाळी पाठीमागून मोटरसायकल आली आणि त्यांनी दादू यांच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून ते विस्टा कॉर्नरच्या दिशेने भरधाव वेगाने पळून गेले. ९० हजार रुपये किमतीची सोन्याची चेन व त्यामधील लॉकेट पळवून नेले.

# निवडून आले अन् गायब झाले

## पदवीधरांचे आमदार आहेत कुठे? पदवीधरांचा सवाल

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कोकण पदवीधर मतदारसंघात २६ जून रोजी मतदान होणार आहे. या मतदारसंघात सलग तिसऱ्यांदा निरंजन डावखरे हे पुन्हा निवडणुकीला सामोरे जात आहेत. मात्र मागील सहा वर्षे विधानपरिषद सदस्य असलेले निरंजन डावखरे यांनी कर्जत तालुक्यासाठी काय केले? असा थेट प्रश्न पदवीधर मतदार विचारत आहेत.**

कोकण पदवीधर मतदारसंघाची निवडणूक जाहीर झाली आहे. जून २०१८ मध्ये या मतदारसंघात झालेल्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे उमेदवार निरंजन डावखरे यांनी महायुतीचे उमेदवार म्हणून निवडणूक लढविली होती. या निवडणुकीनंतर आमदार बनलेले निरंजन डावखरे यांच्या विजयात कर्जत तालुक्याचा मोठा वाटा राहिला होता. मात्र निवडून आल्यावर विधानपरिषद सदस्य निरंजन डावखरे यांनी कर्जत तालुक्यासाठी काय केले? असा प्रश्न सहा वर्षांनी सर्वसामान्य लोक आणि मतदार उपस्थित करीत आहेत.



सहा वर्षे आमदार राहिल्यावर निरंजन डावखरे यांची आमदारकीची मुदत या महिन्यात संपत आहे. अशावेळी कोकणातील सर्व सहा जिल्ह्यात जाऊन वेळ देणे हे जरी कठीण असले तरी वर्षातून किमान एक फेरी आपल्याला मतदान केलेल्या पदवीधर यांच्यासाठी घेतलेली दिसत नाहीत. सहा वर्षांच्या काळात जेमतेम तीन वेळा विविध कार्यक्रमांसाठी निरंजन डावखरे उपस्थित राहिलेले दिसले. त्यामुळे पदवीधर मतदार दरवेळी आपले आमदार कुठे आहेत असा प्रश्न सातत्याने उपस्थित करायचे.

मात्र दुसरीकडे कर्जत तालुका हा निरंजन डावखरे यांचे निवास स्थान असलेल्या ठाणे शहरापासून उपनगरीय लोकल ने सव्वा तासावर आहे. असे असतानादेखील आमदारांचे पाय कर्जत तालुक्यात सहा वर्षात सहावेळादेखील लागले नाहीत. सहा जिल्हांचा मतदारसंघ असल्याने साहजिकच निधी वाटपात अन्याय होणार, पण सहा वर्षात दरवर्षी एक काम याप्रमाणे सहा विकास कामे कर्जत तालुक्यात निरंजन डावखरे मंजूरदेखील करू शकले नाहीत. त्यामुळे सहा वर्षांनी पुन्हा निरंजन डावखरे हे पदवीधर मतदार यांचे प्रश्न कसे ऐकले जाणार ? हा प्रश्न देखील त्यांच्या कधीही न दिसण्याने उपस्थित केला जात आहे.

कर्जत तालुक्यात आपला विकास निधी देण्यासाठी हात आखडता घेणाऱ्या निरंजन डावखरे यांना भारतीय जनता पक्षाने पुन्हा कोकण पदवीधर मतदारसंघाची उमेदवारी दिली आहे. त्यामुळे कर्जत तालुक्यात साधे दर्शन देण्याचे टाकणाऱ्या निरंजन डावखरे यांना कोकण पदवीधर मतदारसंघात कर्जत तालुक्यातील मतदार यांना कसे आपलेसे करतात. याकडे महायुती मधील घटक पक्षांचे लक्ष लागून राहिले आहे.

महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी लढत पदवीधर मतदारसंघात होणार आहे. कर्जतचे लोकसभा निवडणुकीचे निकाल पाहता महायुतीचे नेते पुन्हा हातात हात घालून एकत्र दिसण्याची शक्यता फार कमी आहे. त्याचा फायदा महाविकास आघाडी उचलण्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीत प्रचार यंत्रणा महायुतीच्या घटक पक्षांनी आपापल्या पक्षांच्या कार्यालयातून राबवली. त्यामुळे कोकण पदवीधर मतदारसंघातदेखील अशीच स्थिती राहणार आहे.




# शीतल भोपी दूंदरेच्या उपसरपंचपदी

**। पनवेल । वार्ताहर ।**

शेतकरी कामगार पक्षाच्या शितल कैलास भोपी यांची दूंदरे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

दूंदरे ग्रामपंचायतीचे उपसरपंच जयदास चौधरी यांनी राजीनामा दिल्यानंतर थेट सरपंच सुभाष भोपी यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी कामगार पक्षाच्या ग्रामपंचायत सदस्या शितल कैलास भोपी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी ग्रामपंचायतीचे शेकापचे सर्व सदस्य उपस्थित राहून पाठिंबा दर्शवून शुभेच्छा दिल्या. यावेळी शुभेच्छा देण्यासाठी माजी आमदार बाळाराम पाटील, माजी सभापती काशिनाथ पाटील, माजी उपसभापती राजेश केणी, माजी जिल्हा परिषद सदस्य विलास फडके, रायगड भूषण भारत भोपी तसेच ग्रामपंचायत सदस्य कैलास भोपी, विश्वास पाटील, महेश पाटील, सुप्रिया करनेरकर, शकुंतला गोसावी, ग्रामस्थ महादेव गायकर, साईनाथ भोपी, बाळाराम पाटील, दिपक पाटील आदी मंडळींनी ग्रामस्थ नागरिकांनी शुभेच्छा देऊन वाजत गाजत नाचत रथात मिरवणूक काढण्यात आली.



# तज्ज्ञांचे आरोग्य मार्गदर्शन

**। पनवेल । वार्ताहर ।**

जीवनशैली स्वस्थ असेल तर आपण कॅन्सर सारख्या असाध्य आजारापासून स्वत:ला वाचवू शकतो, असे उद्गार ब्रह्मा कुम ारीज द्वारा आयोजित कार्यक्रमात प्रसिद्ध स्त्रीरोग, कॅन्सर आणि गर्भ संस्कार तज्ञ बीके डॉ शुभदा नील यांनी केले. त्यांनी गर्भाशय ग्रीवा आणि स्तन कर्करोग जनजागृतीवर मार्गदर्शन केले. डॉ. शुभदा नील यांचा नाशिक ब्रह्मा कुमारिज तर्फे वासंती दिदी यांनी सत्कार केला. स्तन कॅन्सरच्या बचावासाठी दर म हिन्याला स्व स्तन परीक्षण, वर्षांतून एकदा डॉक्टरांकडून तपासणी तसेच चाळीशीनंतर सोनोमॅमोग्राफी करणे गरजेचे आहे असे मोलाचे मार्गदर्शन त्यांनी केले. स्वस्थ जीवनशैली साठी नियमित व्यायाम, सात्विक शाकाहारी भोजन, फळ भाज्या, गाढ झोप, ध्यान धारणा अंगिकारणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे नेहमी शांत, खुश, शक्तीशाली हलके राहिल्याने आपण निरोगी राहू शकतो. गर्भाशय ग्रीवा कर्करोग ह्या आजारापासून बचाव करायचा असेल तर पॅप तपासणी, व्हाया तपासणी ह्या सारख्या तपासण्या २१ ते ६० वर्षाच्या महिलांनी करणे आवश्यक आहे. तसेच मुलींना व महिलांना लसीकरण करणे गरजेचे आहे.

## अलिबागच्या ईशिता म्हात्रेचे यश

**अलिबाग :** नुकत्याच जाहीर झालेल्या नीट परीक्षेमध्ये अलिबाग तालुक्यातील नारंगी गावातील ईशिता हृदयनाथ म्हात्रे हिने ७२० पैकी ७०१ गुण प्राप्त करुन ( AIR १५८१)आपला MBBS प्रवेश निश्चित केला आहे. तिच्या या यशाचे श्रेय रिलायन्समध्ये उच्चपदावर काम करणारे वडिल, एल्आयसीमध्ये कार्यरत असणारी आई, आकाश क्लासेस आणि आजी आजोबांना दिले आहे. तिच्या यशाबद्धल सर्व स्तरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




# गतिरोधकांवरील पांढरे पट्टे गायब

## निकृष्ट कामांची चौकशी करण्याची मागणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कल्याण-कर्जत राज्यमार्ग रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम खात्याने मागील १५ दिवसांत वाहनांच्या सुरक्षेसाठी गतिरोधकांवर पांढरे पट्टे मारले होते. मात्र, ते पांढरे पट्टे आठ दिवसांतच दिसेनासे झाले आहेत. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता असून असे नित्कृष्ट काम करणाऱ्या ठेकेदाराच्या कामाची चौकशी करण्याची मागणी स्थानिक वाहनचालक करीत आहेत.





कर्जत-कल्याण राज्यम ार्गावरील कर्जत चारफाटा ते वडवली गाव हा रस्ता काँक्रीटचा बनविला गेला आहे.. तर, वडवलीपासून शेलू येथील रस्ता डांबरीकरण केला गेला होता. या २१ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे देखभाल दुरुस्तीची निविदा राज्याचे हायब्रीड तत्वावर देण्यात आली होती. या डांबरी रस्त्यावर नव्याने कार्पेट डांबरीकरण केले जात आहे. त्यामुळे पावसाळ्यात हा रस्ता खड्डेमुक्त झालेला दिसणार आहे. या रस्त्यावर विविध भागात गतिरोधक बनविण्यात आले आहेत. त्या सर्व गतिरोधकांवर डांबरीकरणानंतर पांढरे पट्टे देखील सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मारले जात आहेत. परंतु, काही दिवसांतच ते पांढरे गायब झाले आहेत.

येत्या पावसाळ्यामध्ये वाहन चालकाना अंदाज घेण्यासाठी पांढरा पट्टा नसल्याने गाडी डिव्हायडरवर चढण्याची शक्यता आहे. तसेच, रस्त्यावर डांबराचे कार्पेट वारंवार टाकल्याने रस्त्याम धील दुभाजकांची उंची देखील कमी झालेली आहे. त्यामुळे गाडी दुभाजकवर चढून मोठी दुर्घटना होण्याची शक्यता आहे. रस्त्याच्या सोबत डिव्हायडरचे काम करणे तितकेच गरजेचे आहे, अशी मागणी वाहनचालकांकडून केली जात आहे.

# ४८ उद्यानांत ११०० वृक्षांचे रोपण

## पनवेल महापालिकेचा जागतिक पर्यावरण दिन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

**जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने पनवेल म हापालिकेच्यावतीने शहरातील ४८ विविध उद्यानांमध्ये तब्बल ११०० वृक्षांचे रोपणाचा कार्यक्रम पालिकेने बुधवारी हाती घेतला. पनवेल पालिका आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांच्या हस्ते खारघर वसाहतीमधील सेक्टर १२ मधील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके उद्यानाम ध्ये वृक्षरोपण करण्यात आले. यावेळी पालिकेचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, प्रभाग अधिकारी जितेंद्र मढवी, महापालिका अधिकारी कर्मचारी, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.**

या वृक्षारोपणाच्या कार्यक्रमात पालिका आयुक्त डॉ. रसाळ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना, माणूस हा निसर्गाचा पुत्र आहे. पर्यावरणाचा विकास करणे म्हणजे पर्यावरणांमध्ये ढवळाढवळ न करणे. निसर्ग आहे तसे त्याचे जतन करणे महत्वाचे आहे. म्हणूनच महापालिकेने ११०० झाडे लावण्याचा निर्णय घेतला आहे. पालिका देशी झाडांचे रोपण करत असून भविष्यातील पिढीला पक्षांचे आवाज ऐकवायचे असतील झाडे लावली पाहिजेत,त्यांचे जतन करायला पाहिजे असे मार्गदर्शन या कार्यक्रमामध्ये डॉ. रसाळ यांनी केले.

खारघर वसाहतीसमोर बुधवारी पालिकेच्यावतीने कळंबोली मधील सेक्टर ६ ई भूखंड क्रमांक २ येथील उद्यान येथे उपायुक्त कैलास गावडे यांनी वृक्षारोपण केले. तसेच नवीन पनवेल येथील सेक्टर ११ येथील उद्यानामध्ये मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, प्रभाग अधिकारी अरविंद पाटील, आरोग्य निरीक्षक अरूण कांबळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. नावडे उपविभाग येथे सेक्टर ९ मध्ये उपायुक्त बाबासाहेब राजळे, सेक्टर १५ मधील उद्यानामध्ये लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे, प्रभाग



अधिकारी अमर पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कामोठे येथे उपायुक्त मारूती गायकवाड, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, उप अभियंता राजेश कर्डिले,आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. पनवेल शहरामध्ये सेक्टर १६ मध्ये शहर अभियंता संजय जगताप, म हात्मा गांधी उद्यानामध्ये सहाय्यक स्वरूप खारगे, कल्पतरू उद्यानामध्ये लेखा परीक्षक संदीप खुरपे प्रभाग अधिकारी रोशन माळी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या शिवाय इतर राहिलेल्या उद्यानांमध्ये वृक्ष प्राधिकरण विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आल्याची माहिती पालिकेच्या जनसंपर्क विभागाने दिली. पालिकेने बुधवारी केलेल्या वृक्षारोपणात वड,पिंपळ, कडूनिंब, ताम्हणफूल, नांद्रुक, आकाशनिंब, बहावा, अर्जुन, बिट्टी, अर्जुन, जांभूळ, करंज, पळस, प्राजक्त, सोन चाफा, अशोक, सप्तपर्णी, कुसूम, बकुळ, कदंब शिसव, सुबाभूळ, नारळ, सिता अशोक, शमी, आपटा या देशी प्रजातींच्या झाडांची निवड केली.

खारघार व नावडे प्रभागातील उद्यानांमध्ये ५११, कामोठ्यातील सात उद्यानांमध्ये ८३, पनवेल शहर व नवीन पनवेल मधील १८ उद्यानांमध्ये १६६, कळंबोली व खांदा कॉलनीतील १६ उद्यानांमध्ये ३३६ झाडे लावली पालिकेच्या बुधवारच्या वृक्षारोपण कार्यक्रमांत विविध सामाजिक संस्थांनी सहकार्य केले. खारघरमधील इन्फिनीटी संस्था, पोदार प्रेप, पनवेलमध्ये भारत विकास परिषद, कळंबोली येथे आई शैक्षणिक व सामाजिक संघटना, कामोठेमध्ये पर्यावरण प्रेमी ग्रुप यांचे सहकार्य महापालिकेस मिळाले. तसेच ट्युलिप अंतर्गत इंटर्नशिपसाठी आलेल्या विद्यार्थ्यांनी खारघर उद्यानामध्ये पर्यावरणाचे रक्षण याविषयावर लघुनाटिका सादर केली.


## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय २५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६
- घरकाम व मुलांना सांभाळणे साठी बाई हवी पंतनगर अलिबाग येथे. पूर्णवेळ राहणारी किंवा सकाळी ८.००ते ६ संपर्क-९८६७२१५४९५/८०९७२०५९३९
- N.A . प्लॉट पाहिजे: ४ ते ५ गुंठे, अलिबाग-पोयनाड रस्त्यावर चेंढरे मारूती मंदिरापासून वेश्वीच्या RCF कॉलनीच्या पुढे अर्धा किलोमीटर पर्यंत. मुख्य रस्यापासून प्लॉटपर्यंत १२मीटरचा पक्का रस्ता असणे आवश्यक. जमिनीचा उतारा व नकाशा पाठविणे ही पूर्वअट आहे. टायटल क्लियर असल्यास, जागा व किंमत पसंत पडल्यास त्वरित व्यवहार पूर्ण करण्याची हमी एजंट क्षमस्व, संपर्क : ९००४०३१६९५.
- ५०००० रूपये किमतीचा CNC मशीन ऑपरेटिंगचा कोर्स मोफत, मोफत, मोफत. पात्रता : १२ वी किंवा १५ वी पास, वयोमर्यादा-३० वर्षेपर्यंत. पगार- १०००० रूपये, ८ तास ड्युटी, संपर्क : ९०४९६५५५२३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# मच्छिमारांना रापणाचा आधार



> रापण मासेमारी करताना जाळ्यात मासे कमी समुद्रातील कचरा आणि ऑईल जास्त येत असतो, त्यामुळे जाळी तुटणे त्यामुळे कोळी बांधव आर्थिक संकटात सापडत आहे. शासनाने कोळी बांधवांकरिता विशेष पॅकेजची तरतूद करण्यात यावी.
>
> – प्रकाश सरपाटील, माजी चेअरमन, जय भवानी मच्छिमार सोसायटी

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

१ जूनपासून मासेमारी बंद करण्याचे आदेश असल्याने त्यात मच्छिमार बांधवांना समुद्रात मच्छी मिळत नसल्याने मुरुड परिसरातील मच्छिमार बांधवांनी आठ दिवस आधीच आपल्या बोटी किनाऱ्यावर लावण्यात आल्या होत्या. दिवसामागून दिवस जाऊ लागल्याने उपजीविकेचा प्रश्न उद्भवू लागल्याने काही कोळी मच्छिमार बांधवांनी रापणाचा आधार घेतला आहे.

रापणीचे जाळे फारच मोठे असते. ते पाण्याचा मोठा भाग व्यापते. त्या जाळ्याला दोन्ही बाजूंना ५० ते ६० वाव जाड काथ्याचा दोरखंड, ५० ते ६० पाटे जोडून, १५ फूट उंची राखली जाते. जाळे जड शिशामुळे तळाला जाऊन उभे राहते. त्यामुळे मासे जाळ्याच्या बाहेर जाऊ शकत नाहीत. जाळ्याच्या तरंगाची पूर्ण माळ कमी पाण्यात दिसत असते. पुढे मार्ग काढत जाळे टाकले जाते. उसळत्या लाटांमध्ये किनाऱ्यावर येतो. रापण ओढण्याकरिता ८ ते ९ जण लागतात. हे दोरखंड मातीत/वाळूत खोलवर पाय रोवून ओढला जातो. हे मच्छीमार बांधव फार श्रमाचे असल्यातरी आपल्या उपजीविकेसाठी हे काम करावे लागते. कधी मासे जाळ्यात येतात तर कधी येत नाही. तरी पण रापणाचा कोळी मच्छिमार बांधवांना असतो.

मुरुड-एकदरा परिसरात मच्छिमार बोटी १०३ व छोट्या बोटी ३० ते ४० आहेत. यावर्षीचा हंगाम मच्छिमार बांधवांना चांगला गेला नाही. सतत होणाऱ्या हवामानातील बदलामुळे व एलईडी बोटींची अनधिकृत मासेमारी मुरुडचा कोळीबांधव पुरता खचला आहे. आता तर पावसाळा सुरू झाला असून, बोटी किनारी आल्या आहेत. कोळीबांधव रोज सकाळी ४ वाजता उठून समुद्राच्या भरतीवेळी उसळलेल्या लाटांमध्ये मोठी लांब जाळी खांद्यावर घेऊन जातात. एक जाळे पकडण्यासाठी २० ते ३० जण तरुण लागतात. दुपारपर्यंत रापण करून जे मासे मिळतात ते विकून आपला वाटा घेऊन घरी यायचे, असा दिनक्रम पुढील दोन महिने सुरू राहणार आहे. जे शारीरिकरित्या कमकुवत आहेत, ते बांधव गवंडी कामात व पेंटिंग कामास लागतात. अशी कोळी बांधवांची स्थिती पूर्वी नव्हती. आम्हा कोळी बांधवांचे नेमकं चुकलं तरी काय, असा सवाल कोळी बांधवांकडून करण्यात येत आहे.

दैनिक कृषीवल ला वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!





शुभेच्छुक

घाडी बंधु यांचे घाडी सोडा फॅक्टरी आमच्या येथे थंड पेय होलसेल दरात मिळतील.

संपर्क - ९९२२५६७५४१ मु.मुनवली, पो.मापगांव, ता.अलिबाग,जि.रायगड

# संघाचे पोस्टमन

पडलो तरी नाक वर हे भाजपचे खास वैशिष्ट्य आहे. लोकसभा निवडणुकांचे निकाल येत होते तेव्हा भाजपला नसले तरी एनडीएला बहुमत मिळाले आहे असे भाजपचे नेते सांगत होते. कोणत्याही स्थितीत हा मोदींचा पराभव आहे हे मान्य करायचे नव्हते. वास्तविक मोदी की गॅरंटी म्हणून भाजपने मते मागितली. एनडीएचा सोडाच भाजपच्या इतर नेत्यांचासुध्दा उल्लेख त्यात नव्हता. अशा वेळी भाजपला २७२ पेक्षा ३२ जागा कमी मिळणे हा मोदींचा सणसणीत पराभव होता. पण त्यांना बोलणार कोण असा प्रश्न होता. महाराष्ट्रातही आमची मते वाढली आहेत असे सुरुवातीला सांगून पाहिले. पण आकडे इतके लख्ख आणि लाजिरवाणे आहेत की अखेर जनतेने कानफटात मारली आहे हे सांगावे लागले. आता हे मान्य करण्यामध्ये देखील राजकारण सुरू झाले आहे. देवेंद्र फडणवीसांनी राजीनामा देण्याची व्यक्त केलेली इच्छा हा त्याचाच भाग आहे. उपमुख्यमंत्रिपदाच्या जबाबदारीतून मोकळे करा, मला आता विधानसभेच्या दृष्टीने पक्षासाठी काम करायचे आहे असे देवेंद्रांनी म्हटले आहे. देवेंद्र हे लबाड नेते आहेत असे विरोधक म्हणतात. आपण त्यांना चलाख म्हणूया. हा राजीनामा देतानाही त्यांनी अनेक प्रकारची चलाखी केली आहे. देवेंद्रांना लोक कितीही शिव्या देत असले तरी भाजपमध्ये त्यांना मानणारा एक मोठा वर्ग आहेच. देवेंद्रांची प्रशासनावरची पकड, धडाधड आकडेवारी सांगण्याची बुध्दिमत्ता, विरोधकांवर बाजू उलटवण्याचे कसब, गृह खात्याचा उपयोग करून सगळ्यांना जरबेत ठेवण्याची शक्ती यामुळे अनेक जण त्यांची स्तुती करतात. या भक्तांमध्ये आपला खुंटा बळकट करणे देवेंद्रांसाठी आवश्यक होते. त्यासाठी ते पत्रकार परिषदेत रडले. पराभवाला आपण जबाबदार नाही, पण तरीही आपण हुतात्मा व्हायला तयार आहोत असा देखावा निर्माण केला. राजीनामा देण्याची केवळ इच्छा व्यक्त केली. पक्षश्रेष्ठींनी काय तो आदेश द्यावा असे म्हणून चेंडू त्यांच्या कोर्टात ढकलला.

## विधानसभेची चिंता

महाराष्ट्रात भाजपने शिवसेना व राष्ट्रवादीमध्ये ज्या रीतीने फोडाफोडी केली त्यामुळे जनतेत प्रचंड संताप होता. त्या रागामुळेच भाजपच्या जागा २३ वरून अवघ्या नऊ इतक्या खाली आल्या आहेत. फोडाफोडीची अंमलबजावणी देवेंद्र फडणवीस यांनी केली असली तरी त्याचे मुख्य सूत्रधार मोदी व शाह हेच आहेत. इडी, सीबीआय अशा यंत्रणा हाताशी असल्याने वाटेल त्या उलथापालथी करून आपण यश मिळवू शकतो असे त्यांना वाटते. शिवसेना फोडली की ठाकरे आणि राष्ट्रवादीतून अजित पवारांना फितवले की शरद पवार खलास होतील अशी त्यांची गणिते होती. निव्वळ शक्तीच्या हिशेबात पाहायचे तर ती बरोबर होती. कारण, विरोधकांची वजाबाकी म्हणजेच भाजपची बेरीज होणार होती. पण राजकारण निव्वळ अशा समीकरणांवर चालत नाही. जनता नावाचा एक जिवंत घटक महत्वाचा असतो. राजकारणी मंडळी युत्या करतात व मोडतात हे जनतेच्या अंगवळणी पडले आहे. पण हे करताना सर्व नीतीमत्ता पायदळी तुडवली जाणार असेल तर जनता ते मान्य करीत नाही. शाह व मोदी यांनी हे निर्णय वरून लादले व इथल्या नेत्यांनी खाली मान घालून ते विनातक्रार मान्य केले. अवघे चाळीस आमदार असूनही एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करण्याचा व देवेंद्रांना उपमुख्यमंत्रीपद स्वीकारण्याचा जाहीर आदेश देण्याचा प्रकारही शाह-मोदी यांची हुकुमशाही दर्शवणारा होता. इथल्या भाजपवाल्यांना ती मान्य करावी लागली. आपल्याप्रमाणे जनतेनेही ती स्वीकारलेली आहे, किंबहुना जनतेला यामुळे फार आनंद झाला आहे असे देवेंद्र आणि मंडळी प्रचारात सांगत होते. सेनेला नकली सेना म्हणणे, उद्धव आणि पवार यांचा बाजार उठवण्याची भाषा करणे हा त्याच उन्मादाचा भाग होता. आता जनतेने त्यांची मस्ती उतरवल्यानंतर देवेंद्रांचे विमान जमिनीवर आले. त्यानंतर, आहे या युतीसह विधानसभेला सामोरे जाणे शक्य नाही हे त्यांच्या लक्षात आले असावे.

## शिंदे नवे नीतीश?

युतीमध्ये अजित पवार यांचा दारूण पराभव झाला आहे. त्यांचा राष्ट्रवादीचा गट म्हणजे महायुतीतली नसती बिलामत आणि फालतूचे ओझे असल्याचे सिध्द झाले आहे. दुसरीकडे शिंदे यांना सात जागा मिळाल्या असे दिसत असले तरी तीन ठिकाणी त्यांना तिरंगी लढतींचा फायदा झाला आहे. तर कल्याण आणि ठाण्यामध्ये भाजपच्या पाठिंब्याखेरीज त्यांना विजय मिळवणे कठीण होते हे स्पष्ट आहे. तरीही भाजपच्या केंद्रातील जागा कमी झाल्याने शिंदे गट निव्वळ सात जागांसह एनडीएमधील तिसऱ्या क्रमांकाचा पक्ष होऊन बसला आहे. बिहारमध्ये भाजपला नीतीशकुमार यांच्या जवळपास दुप्पट जागा आहेत. तरीही केवळ राजकीय समीकरणांपायी तेथे नीतीश यांना मुख्यमंत्रिपद देणे भाजपला सतत भाग पडले आहे. याच रीतीने आता विधानसभा निवडणुकांनंतर शिंदे गटाच्या जागा कमी आल्या तरी एकनाथ शिंदे यांनाच मुख्यमंत्रिपद द्यावे लागणार की काय या विचाराने देवेंद्रांची झोप उडाली असेल. त्यामुळे ही कोंडी फोडण्यासाठी त्यांनी राजीनामा दिला असावा. राज्यातील समीकरण ताबडतोब बदला अन्यथा, विधानसभेला आपला पराभव होईल असे सांगण्यासाठीच हा निर्णय त्यांनी घेतला आहे. दुसरे म्हणजे, होता होईल तो देवेंद्रांना पुन्हा मुख्यमंत्री करायचे नाही असे अमित शाह यांचे धोरण आहे. त्यामुळेच फडणवीस यांना केंद्रात नेले जाणार अशी चर्चा अधूनमधून चालू असते. आतादेखील त्यांना दिल्लीत बोलावून घेण्याचे चालले आहे. याला शह देण्यासाठीही त्यांनी हे पाऊल उचलले असावे. भाजपचा केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर उत्तर प्रदेश व इतरत्रही जबर पराभव झाला आहे. मात्र त्याची जबाबदारी आतापर्यंत कोणीही स्वीकारलेली नाही. वास्तविक मोदींनी त्याबद्दल किमान माफी तरी मागायला हवी होती. ते न झाल्याने संघानेच देवेंद्रांना पोस्टमन करून हा निरोप दिलेला दिसतो. संघाची आम्हाला आता गरज नाही असे भाजपचे अध्यक्ष नड्डा यांनी यापूर्वी जाहीर केले आहे. ते या निरोपाची कशी बोळवण करतात हे पाहणे मनोरंजक ठरेल.

विचार

# गरज जलनियोजनाची

*यंदाचा पाऊसकाळ सुरू झाला असून सर्वत्र चांगल्या पावसाचा अंदाज व्यक्त केला गेला आहे. मात्र सध्या पाऊसही लहरीपणा दाखवत असल्याचे गेल्या काही वर्षांच्या अनुभवातून सिद्ध झाले आहे. म्हणूनच पडणाऱ्या प्रत्येक थेंबाची साठवण आणि साठवलेल्या जलाचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. तरच कमी-अधिक प्रमाणात पडला तरी आपल्या वाढत्या गरजा पूर्ण करु शकेल, इतका जलसाठा गाठीशी राहील.*



यंदाचा उन्हाळा प्रचंड कडक होता. खरे तर अलिकडे हे वाक्य दर वर्षीच अनेकांच्या तोंडून ऐकायला मिळते. ग्लोबल वॉर्मिंगचा सार्वत्रिक परिणाम आणि प्रभाव या वाक्यातून समोर येतो. त्यातच यंदा दिल्लीतील एका भागामध्ये तापमानाने ५२ अंश सेल्सियसच्या पुढे मजल मारल्यामुळे याचे गांभीर्य पराकोटीचे वाढल्याचे जाणवत आहे. मात्र अखेर ही रखरख थांबून आता मान्सून अवतरला आहे. यंदाचा पाऊसकाळ समाधानकारक असल्याचे भाकीत वर्तवले गेले आहे. साधारणपणे या संपूर्ण हंगामात १०५ टक्के पाऊस पडेल, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यामुळेच पाऊस हवा तेवढा आणि हवा तेव्हा पडेल आणि शेतकऱ्यांना समाधानकारक परिणाम बघायला मिळतील, या अपेक्षेनेच आगामी पर्जन्यकाळाकडे पाहू या.

अर्थात अलिकडे पाऊसही भरवशाचा राहिलेला नाही. गेल्या काही वर्षांचा अंदाज तर त्याचा लहरीपणाच दाखवून देतो. त्यातच कमी कालावधीमध्ये पडणारा प्रचंड पाऊस ही अलिकडची मोठी समस्या ठरत आहे. असा अतिरेकी पाऊस पाणवठ्यांमधील जलसाठा वाढवत नाहीच पण दुसरीकडे त्याच्या प्रभावामुळे जमिनींमध्ये अतिरिक्त पाणी साचल्याने पिकांचे नुकसान होते. म्हणजेच कुठे अतिवृष्टी तर कुठे अत्यल्प पाऊस; कुठे पाणी तुंबण्याचे प्रकार तर कुठे दरडी कोसळून होणारे नुकसान; कुठे प्रचंड पावसात जुन्या इमारती कोसळल्याने होणारी जीवित आणि वित्त हानी तर कुठे रेल्वे-लोकल यंत्रणा पाण्याखाली गेल्यामुळे होणारी प्रवाशांची फरफट अशी एक ना अनेक प्रकारची संकटे या काळालाही चिंताग्रस्त अवस्थेत ठेवतात. कोणतीही पूर्वसूचना न देताना धरणांमधील पाणी सोडल्यामुळे, नद्या-ओढ्यांना पूर आल्यामुळे लोकांच्या घरात पाणी शिरुन होणारे नुकसान, त्यामुळे गुराढोरांच्या जीविताला असणारा धोकाही अशा संकटांचे गांभीर्य वाढवून जातो. बघता बघता गावे ढिगाऱ्याखाली दबण्याच्या वाढत्या घटनाही मन हेलावून टाकणाऱ्या ठरतात. पावसाचा अथवा पर्जन्यकाळाचा हाच बदलता आणि काहीसा धास्तावणारा ट्रेंड लक्षात घेता सुरूवातीपासून नियोजनाची गरज लक्षात घेणे गरजेचे आहे. पाऊस स्थिरावेपर्यंत आपली चोख तयारी झाली तर आपण या काळात होऊ शकणारे सर्व प्रकारचे नुकसान टाळू शकू. अन्यथा मागच्या पानावरुन पुढे... अशाच स्वरुपात हा हंगामही मागे पडेल.

पावसावर सगळ्यांच्या अपेक्षा केंद्रित असतात. त्यातील एक म्हणजे पावसामुळे दुष्काळ संपेल, अशी आशा असते. खरे तर दुष्काळाचे खापर निसर्गावर फोडण्यात काहीच अर्थ नाही. पाऊस कमी पडला म्हणून दुष्काळ पडला, असे समजणेच चुकीचे आहे.

**जनार्दन पाटील**

हे बाळबोध विचार आहेत असे म्हणावे लागेल. याचे कारण सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला तरी तो आपली गरज भागावी इतका नक्कीच असतो. किंबहुना, तो गरजेच्या तिप्पट पडतो. हे ऐकून आश्चर्य वाटले असले तरी ते सत्य आहे. त्यामुळे पाऊस कमी झाला म्हणून दुष्काळ आला असे म्हणण्यात अर्थ नाही. गरज आहे ती उपलब्ध पाण्याच्या काटेकोर वापराची. उदाहरणार्थ, एखाद्या गावाचे क्षेत्रफळ २००० हेक्टर इतके असेल आणि तेथे दर वर्षी ५०० मिली म्हणजे अर्धा मीटर पाऊस पडला तरी त्यातून दहा लाख टँकर्सना पुरेल इतके पाणी उपलब्ध होते. विशेष म्हणजे हे शुध्द, डिस्टिल्ड वॉटर असते. या पाण्याचा वापर ३६५ दिवस २४ तास करता येणे सहज शक्य आहे. अर्थातच त्यासाठी पाण्याचा काटकसरीने वापर आणि त्याची योग्य साठवणूक या बाबी गरजेच्या ठरतात. सध्या आपण याच बाबीवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे.

दर वर्षी साधारणपणे जून ते सप्टेंबर या कालावधीत किती पाऊस पडणार याचे अनुमान काढले जाते. त्यात उणे-अधिक झाले तरी सप्टेंबरपर्यंत पुरेल एवढा पाणीसाठा ठेवल्यास दुष्काळी स्थिती निर्माण होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. आता विज्ञान बरेच पुढे गेले आहे. त्याच्या सहाय्याने पाणी साठवण तसेच वापरासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करता येणे शक्य आहे. उदाहरण द्यायचे तर तळी तयार करून, प्लास्टिक अंथरून पाणी साठवणे शक्य आहे. म्हणजेच एखादे वर्षी पाऊस पडला नाही तरी फारसे बिघडणार नाही असे आदर्श आणि आश्वासक चित्र निर्माण व्हायला हवे. ते अशक्य नाही. परंतु ते प्रत्यक्षात येण्यासाठी गरज आहे ती जलसाक्षरतेची. आपल्याकडे पाणीसाठवण आणि पाणी वापराबद्दल बरेच गैरसमज आहेत. जलनिरक्षरतेचा कळस ठरावा अशी स्थितीही काही ठिकाणी पहायला मिळते. त्यात सुधारणा करायची तर एक लिटर पाणी म्हणजे किती, क्युसेक्स म्हणजे काय या प्रश्नांची उत्तरे जाणून घ्यायला हवीत. त्याचबरोबर कोणत्या गोष्टीसाठी किती पाणी लागते याचे गणित लक्षात घेणेही आवश्यक आहे.

कोणतीही गरज भागवायला प्रचंड पाणी लागते. विजेचा विचार करायचा तर एक युनिट वीजेसाठी चार हजार लिटर पाणी वापरले जाते. एक लिटर पेट्रोलसाठी ५० हजार लिटर पाणी वापरले जाते. ते कसे हे सहज लक्षात येणार नाही. आपण कच्च्या तेलाची आयात करतो, त्यासाठी संबंधित देशाकडे मांस पाठवावे लागते. आपल्या देशातून दीड किलो बीफ पाठवले जाते तेव्हा त्यातून एक लिटर पेट्रोल येते. हे दीड किलो बीफ तयार करण्यासाठी ५० टन पाणी लागते. अशा तऱ्हेने काही कोटी टन बीफची निर्यात केली गेली तेव्हा त्या माध्यमातून किती पाणी वापरले गेले याचा अंदाज बांधता येतो. एक किलो साखर तयार करण्यासाठी चार हजार लिटर पाणी लागते. आजच्या विकासनितीमुळे पाणी शेतातून शहराकडे वाहत आहे, ही बाबही लक्षात घेण्याची आवश्यकता आहे. राज्यात उसाच्या लागवडीखालील क्षेत्र वाढत असून या पिकाला सर्वाधिक पाणी लागते. त्यामुळे उसाच्या लागवडीवर निर्बंध आणावेत, असा विचार वारंवार बोलून दाखवला जात आहे. तेही एक प्रकारचे अज्ञानच म्हणायला हवे. ऊस बागायतदार स्वत: शेतातील उसापासून तयार होणारी सर्व साखर खात नाही किंवा ऊसही खात नाही. ऊस गाळपासाठी कारखान्यांकडे पाठवला जातो. उसासाठी वापरलेले पाणीही बाहेर जाते. त्याचा वापर संबंधित ऊस उत्पादकांकडून होत नाही हे लक्षात घ्यायला हवे. यावरून पाण्याचा अधिक वापर होतो म्हणून उसाच्या लागवडीवर निर्बंध आणावेत असे म्हणणे उचित ठरत नाही. विशेष म्हणजे शहरातील दरडोई पाण्याचा वापर हा ऊस बागायतदारापेक्षा अधिक आहे. या साऱ्या बाबींवरून 'व्हर्च्युअल कंटेंट ऑफ वॉटर'चे महत्त्व लक्षात येते. यामध्ये तुम्ही कोणत्या गोष्टीसाठी किती पाण्याचा वापर करता याचा अभ्यास केला जातो. त्यावरून 'वॉटर फूट प्रिंट' काढता येते. एक किलो तांदळाचे उत्पादन घेण्यासाठी अकरा हजार लिटर पाणी लागते तर एक लिटर दुधासाठी दहा हजार लिटर पाण्याची आवश्यकता असते. अशा पध्दतीने प्रत्येक गोष्टीचा गणित मांडून विचार केला जायला हवा.

पाण्याचा एकूण वापर आणि प्रत्यक्षातील उपलब्धता याचेही गणित गरजेचे ठरते. साधारणपणे पाण्याचा वापर चार कोटी घनमीटर इतका असतो. त्यामुळेच उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर आवश्यक ठरतो. आकाशातून पडणाऱ्या पाण्याला 'ग्रीन वॉटर' म्हणतात. कॅनॉलमधून येणाऱ्या पाण्यालाही 'ग्रीन वॉटर' असे संबोधले जाते. उन्हाळ्यात पाणी पातळी खाली जाते आणि त्यात जागोजागचे घाण पाणी मिसळत असते. म्हणून मग या पाण्याला 'ब्लॅक वॉटर' म्हणतात. एखाद्या जिल्ह्यात पावसाद्वारे एक कोटी घनमीटर पाणी पडले आणि ग्रे वॉटर व ब्लॅक वॉटर मिळून एक कोटी घनमीटर पाणी उपलब्ध झाले तर एकुणात बऱ्यापैकी पाण्याची तूट जाणवते. ती गृहित धरून पाणीवापराचे नियोजन व्हायला हवे.

आपल्याकडे अनेक जिल्हे परंपरागत दुष्काळी म्हणून ओळखले जातात. मात्र काही गावांनी दुष्काळी स्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी हजारो बोअरवेल्स घेतल्या आहेत. त्याद्वारे कधीही काढले न गेलेले भूस्तरातील पाणी काढल्यास त्याच्या आधारे शेतीक्षेत्रात विविध पिकांचे उत्पादन घेणे शक्य होईल. हे उत्पादन विक्रीसाठी बाजारपेठेत जाईल. साहजिक तेथील पाणीही बाजारपेठेकडे नेता येईल. याच पध्दतीने पाण्याची निर्यात वाढवणे शक्य होईल. मुख्य म्हणजे ही सारी माहिती जल साक्षरतेच्या माध्यमातून सामान्यापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. ती लक्षात घेऊनच पाणी वापराचे नियोजन झाले तर अनेक प्रश्नांची उत्तरे मिळू शकतील. अन्यथा, चेरापुंजीसारखा पाऊस सर्वत्र कोसळला तरी दुष्काळाचे चित्र समोर येत राहणार आहे. तसे ते येऊ द्यायचे का, याबाबत विचार करणे ही काळाची गरज आहे.

आजकाल

# मोदीभक्त देत आहेत अयोध्येतील हिंदूंनाच शिव्याशाप



गेल्या जानेवारी महिन्यात राममंदिराच्या उद्घाटनाचे निमित्त साधत भाजपने देशभर वातावरण गरम केले होते. हे वातावरण एक प्रकारे हिंदू विरुद्ध मुस्लिम असे नॅरेटिव्ह तयार करणारे होते. देशभरातले सर्व पक्षांचे राजकीय नेते, बडेबडे उद्योजक, बॉलीवूड स्टार, सेलेब्रिटीज, देशातले-परदेशातले वेगवेगळ्या क्षेत्रातल्या नामवंत व्यक्ती, विविध धर्मांचे मठ, संप्रदायाचे धर्मगुरु यांना एका रांगेत उभे करण्याची किमया मोदींनी साधली होती. एक प्रकारचा अहंभावीपणा, आपणच देशातले सर्वात शक्तिशाली आहोत, अशी प्रचंड वर्चस्ववादी मोदींची देहबोली होती. मोदींच्या राजकीय कारकिर्दीतला हा सर्वोच्च क्षण असल्याचे भाजपच्या नेत्यांचे, टीव्हीपत्रकारांचे मत होते. भारतातील कोट्यवधी व्हॉट्सअप अकाउंट्स राममंदिराच्या मेसेजनी ठप्प झाली होती. बिलियन्स मेसेजची देवाणघेवाण त्या महिन्याभरात झाली असेल. देशभर भाजपचे व संघकार्यकर्ते राममंदिराच्या अक्षता घेऊन घरोघरी जात होते. ज्या मुद्द्यावर आपला पक्ष जन्मास आला, त्याची वाढ होत गेली, त्या मुद्द्याला सुस्थितीत असलेल्या व सुस्थितीत जात असलेल्या समाज घटकाचे समर्थन मिळत गेले, त्या सर्वांचे स्वप्न आपण वास्तवात आणत असल्याचा एक आनंद मोदींच्या चेहऱ्यावर दिसत होता. त्या घटनेला जे विलक्षण कव्हरेज देशभर मिळाले, त्यातून उल्हसित होत भाजपच्या थिंकटँकमध्ये ४०० पारची घोषणा आकारास येऊ लागली व ती टुम घेत मोदीकी गॅरंटी ही आणखी एक टूम मतदारांच्या माथी मारण्याचे उद्योग सुरू झाले. यात अयोध्या हे एक टुरिस्ट डेस्टिनेशन सुरू झाल्याचे घोषित झाले. विमानांची, रेल्वेची, बसगाड्यांची, खासगी गाड्यांची बुकिंग फुल्ल होऊ लागली. त्या दोनेक महिन्यात कोट्यवधींची उलाढाल झाल्याचे व्हॉट्सअप फिरू लागले. अयोध्याला जाणे व तेथे जाऊन रामाचे दर्शन घेणे याला चारधाम यात्रा, काशीविश्वनाथ यात्रा, अष्टविनायक यात्रा यांपेक्षा ग्लॅमर प्राप्त झाले. तशी जाहिरातही टुरिस्ट कंपन्या देऊ लागल्या.

**सुजय शास्त्री**

हे सगळे सांगण्यामागचे एक कारण असे की, २०२४चे निकाल ४ जून रोजी आल्यानंतर याच अयोध्येत हिंदूंनी जाऊ नये, तेथील लोकांना रोजगार मिळू नये, या लोकांना देशोधडीला लावावे असे मेसेज व्हॉट्सअप, फेसबुकवर फिरू लागले आहेत. अर्थात हे मेसेज मोदी भक्त संप्रदायातून फिरवले जात आहेत. (त्यात सामान्य हिंदू-मुस्लिम-ख्रिश्चन नागरिक नाहीच.) हा संप्रदाय मोदींना सत्तास्थापन करण्यासाठी केवळ ३२-३४ जागा कमी पडल्याने खवळला आहे. या कमी पडलेल्या जागेत त्यांच्या दुर्दैवाने अयोध्या (फैजाबाद लोकसभा मतदारसंघ) हे तीर्थस्थळ येते. तो राग त्यांनी आता बिचाऱ्या अयोध्यावासीयांवर काढण्यास सुरुवात केली आहे. अयोध्या हे फैजाबाद मतदारसंघात येते, त्या मतदारसंघात दोन वेळा निवडून आलेले भाजपचे खासदार लल्लू सिंह यांचा पराभव समाजवादी पार्टीचे ९ वेळा आमदार असलेले अवधेश प्रसाद यांनी ५४,५६७ मतांनी केला. हा पराभव एक अपशकुन झाल्याचे भक्तसंप्रदायाला वाटत आहे. साधारण भक्तांचा राग हा मुसलमानांवर असतो पण इथे राग हिंदू धर्मियांवर आहे, ही एक विशेष उल्लेखनीय बाब आहे. ती लक्षात घ्यावी लागेल. या रागात भक्तांच्या मनातील जातवर्चस्वाचीही जाणीव आहे. विजयी झालेले अवधेश प्रसाद हे दलित आहेत. असे असताना त्यांच्या मागे सर्वजाती धर्माचे अयोध्यावासी गेलेच कसे असा त्रागा भक्तांकडून व्यक्त केला जात आहे.

एखाद्या उमेदवाराला लोक का पाडतात याचे विश्लेषण करण्याची भक्तांमध्ये अजिबात इच्छा नसते. हिंदू धर्म सतत खतरेंमे असल्याने भाजपचेच उमेदवार निवडून आले पाहिजेत, असा त्यांचा अट्टाहास असतो. मोदींच्या १० वर्षांत हिंदू धर्म खतरेतून बाहेर का आला नाही, याचा जाब मोदींना विचारावा असे त्यांना वाटत नाही. २०२४ च्या काळात आपला देश विश्वगुरू झालाय, देशाची अर्थव्यवस्था जगात तिसऱ्या क्रमांकावर आली आहे, आपला जीडीपी ब्रिटनपेक्षा अधिक आहे, आपले उद्‌थान करण्यासाठी साक्षात परमात्म्याने मोदींना या भूमीवर धाडलेले असताना भक्तांचा राग मात्र गरीब अयोध्यावासींयावर आला आहे. या रागाचे काय करायचे?

लोकसंसद

## धन्य ते मतदार आणि धन्य ते खासदार!

१८ व्या लोकसभेच्या नवनिर्वाचित ५४३ खासदारांची यादी प्रसिद्ध झाल्यानंतर अनेक धक्कादायक गोष्टींचा उलगडा झाला आहे. असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटिक रिफॉर्म्सच्या अहवालानुसार, ५४३ नवनिर्वाचित खासदारांपैकी २५१ खासदारांवर (४६ टक्के) गंभीर गुन्हे दाखल आहेत. या २५१ खासदारांपैकी १७० (३१ टक्के) जणांवर बलात्कार, खून, खुनाचा प्रयत्न, अपहरण आणि महिलांवरील गंभीर गुन्ह्यांचे गुन्हे दाखल आहेत. लोकसभेत निवडून गेलेल्या २५१ खासदारांवर गंभीर गुन्हे दाखल असण्याचा हा संसदीय लोकशाहीतला आतापर्यंतचा विक्रम आहे. यामधील २७ नवनिर्वाचित खासदारांनी त्यांच्यावरील दाखल गुन्ह्यांची माहिती त्यांच्या निवडणुकीच्या शपथपत्रात नोंदविल्यानुसार, ते गंभीर गुन्हेगारी प्रकरणांमध्ये दोषी ठरल्याचे जाहीर केले आहे. त्यात भारतीय दंड संहिताच्या कलम ३०२ अंतर्गत खुनाशी संबंधित चार प्रकरणे आणि कलम ३०७ अंतर्गत खुनाच्या प्रयत्नांची २७ प्रकरणे आहेत. आता यापुढे लोकशाहीच्या पवित्र मंदिरात हे सर्व गुन्हेगारी पार्श्वभूमीचे परंतु 'माननीय' खासदार देशाचा भविष्यकाळ ठरवणार आहेत. खरेच, धन्य ते राजकीय पक्ष ज्यांनी यांना उमेदवारी दिली, धन्य ते मतदार ज्यांनी यांना निवडून दिले आणि धन्य ते सन्मानाने निवडून आलेले खासदार!

**- प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**८ जून**

**१८२१:-** प्राच्यविद्यापंडीत, शिलालेख तज्ञ, संशोधक, लेखक आणि निष्णात डॉक्टर भाऊ दाजी लाड यांचा जन्म. **१९१०:-** तत्त्वचिंतक, समीक्षक, विचारवंत दिनकर केशव बेडेकर यांचा जन्म. लेख तसेच कथा-कविताही त्यांनी लिहिल्या. तत्कालिन मासिकांमधून छापून आलेली त्यांचे बरेच लिखाण आजही पुस्तकरुप झालेले नसले तरी 'साहित्यविचार', 'हेगेल : जीवन व तत्त्वज्ञान', 'केशवसुतांची काव्यदृष्टी', 'आधुनिक मराठी काव्य', 'अणुयुगातील मानवधर्म', 'समाज-चिंतन' आदी पुस्तके प्रसिध्द झाली. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे संपादक म्हणून त्यांनी काम केले होते. **१९१७:-** 'मी निरंजनातील वात', 'दोन ध्रुवावर दोघे आपण', 'गगनी उगवला सायंतारा', 'त्या गावी त्या तिथवर' यासारख्या उत्तम कवितांना सुंदर चाली लावून आपल्या उत्कट स्वरांमध्ये सादर करुन गेली. सहा दशके रसिकांवर अधिराज्य गाजविणारे ज्येष्ठ भावगीतगायक आणि संगीतकार गजानन वाटवे यांचा जन्म. 'भावगीत गायनाचे पितामह' असा लौकिक गजाननराव वाटवे यांनी आपल्या कर्तृत्वातून संपादन केला होता. उत्तम कवितांना स्वरसाज देत वाटवे यांनी व्रतस्थपणे मराठी कविता घरोघरी पोचवली. 'गगनी उगवला सायंतारा' हे वाटवे यांचे आत्मकथनपर पुस्तक प्रसिध्द. **१९२४:-** लेखक प्रा. राम जोशी यांचा जन्म. मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु करणाऱ्या प्रा. जोशी सरांनी आजच्या शिक्षणव्यवस्थेचे चित्र 'शिक्षण-चित्र' या ग्रंथातून रेखाटतंय तसेच चाळीसहून अधिक शोध निबंध व काही इंग्रजी पुस्तक प्रकाशित. **१९२७:-** शालेय वयातच 'प्राणज्योत' या हस्तलिखिताचे संपादन करणारे लेखक, स्वातंत्र्यसैनिक मधुकर भगवंत केणी यांचा जन्म. यांची 'अवखळ नाका' ही कादंबरी प्रकाशित झाली आहे. **१९३० :** रामनगरी या आपल्या केवळ एका पुस्तकाच्या जोरावर मराठी साहित्यात साहित्यिक म्हणून नावलौकिक संपादन करणाऱ्या राम विठोबा नगरकर यांचा ५ एप्रिल १९३० रोजी जन्म झाला. त्यांचा जन्म झाला त्यांचे वडील मुंबईला पळून गेले होते. तेव्हा आईच्या वडिलांकडे त्यांची जडणघडण होत होती. त्यांचे आजोबा तमासगीर होते. मारूती नावाचा तमाशा त्याकाळी लोकप्रिय होता. पुढे वडिलांना मुंबईत नोकरी लागल्यावर राम मुंबईत दाखल झाले. गिरगावच्या शाळेत शिकत असताना वडिलांच्या पारंपारिक ससून पेशाला मदतही करत, चले जाव चळवळीत भागसुद्धा घेतला. दरम्यानच्या काळात पोस्टाची परीक्षा पास होऊन पोस्ट खात्यात पॅकर म्हणून चिकटले. या काळात राष्ट्रसेवादलातल्या कलापथकात त्यांच्या अभिनयाची जडणघडण होत होती. विच्छा माझी पुरी करा या लोकनाट्यातील हल्लग्याची भूमिका त्यांची गाजली. यानंतर अनेक नाट्यचित्रपटात त्यांच्या भूमिका गाजल्या. याशिवाय सेवादलाच्या कला पथकातही बराच काळ होते. **१९३० :** रामनगरी या आपल्या केवळ एका पुस्तकाच्या जोरावर मराठी साहित्यात साहित्यिक म्हणून नावलौकिक संपादन करणाऱ्या राम विठोबा नगरकर यांचा ५ एप्रिल १९३० रोजी जन्म झाला. त्यांचा जन्म झाला त्यांचे वडील मुंबईला पळून गेले होते. तेव्हा आईच्या वडिलांकडे त्यांची जडणघडण होत होती. त्यांचे आजोबा तमासगीर होते. मारूती नावाचा तमाशा त्याकाळी लोकप्रिय होता. पुढे वडिलांना मुंबईत नोकरी लागल्यावर राम मुंबईत दाखल झाले. गिरगावच्या शाळेत शिकत असताना वडिलांच्या पारंपारिक ससून पेशाला मदतही करत, चले जाव चळवळीत भागसुद्धा घेतला. दरम्यानच्या काळात पोस्टाची परीक्षा पास होऊन पोस्ट खात्यात पॅकर म्हणून चिकटले. या काळात राष्ट्रसेवादलातल्या कलापथकात त्यांच्या अभिनयाची जडणघडण होत होती. विच्छा माझी पुरी करा या लोकनाट्यातील हल्लग्याची भूमिका त्यांची गाजली. यानंतर अनेक नाट्यचित्रपटात त्यांच्या भूमिका गाजल्या. याशिवाय सेवादलाच्या कला पथकातही बराच काळ होते.तथापि, ज्यामुळे मराठी साहित्यात त्यांचे नाव कोरले गेले ते त्यांच्या 'रामनगरी 'या आत्मनिवेदनपर पुस्तकाने, या पुस्तकातून आपल्या जीवनातील मानअपमानाचे प्रसंग विनोदीरित्या सांगितले, मुख्य म्हणजे, या पुस्तकाच्या आधारे ते स्वतःचा एकपात्री कार्यक्रमसुध्दा करत असत, तत्कालीन सामाजिक तसेच सांस्कृतिक रीतीरिवाज समजण्यासाठी हे पुस्तक आजही मोलाचे ठरत आहे. रामनगरी या पुस्तकाचा राज्य शासनाने पुरस्कार देऊन गौरव केला. तसेच हे त्यांचे पुस्तक, शाळा, महाविद्यालयात पाठ्यपुस्तक म्हणून नेमले गेले. गायनाचे तंत्र, उपजत नाटयगुण आणि हरहुन्नरीपणा यामुळे नगरकर लोकनाट्यात गाजले. आपल्या आत्मकथनातून जीवनाचे रंगतदार आणि मिश्किल वर्णन करणाऱ्या नगरकरांचे ८ जून १९९५ रोजी निधन झाले. **१९३९:-** लेखिका बालमानसशास्त्राच्या अभ्यासिका प्रा. गीता मेहता यांचा जन्म. ह्यांची 'समायोजक मानसशास्त्र', 'सामाजिक मानसशास्त्र', 'सामान्य मानसशास्त्र', 'सुगम मानसशास्त्र' या पुस्तकांसह महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या पाठ्यपुस्तकांच्या त्या सहलेखिका आहेत. **१९४०:-** लेखक जगन्नाथ रावजी नेवाडकर यांचा जन्म. यांचा 'वाटा' हा काव्यसंग्रह आणि 'साखरझोप' ह्या बोलकाव्यासह आनंद, किशोर इत्यादी नियतकालिका तून काव्य प्रकाशित. **१९५०:-** संत लक्ष्मण आडकुजी बारेवार यांचा जन्म. 'विचारचक्र परिवर्तन' हा अध्यात्मिक ग्रंथ त्यांच्या नावावर आहे.

**- संजय वझरेकर**
९९७५५७६६७५

# करीअर हवाई क्षेत्रातलं

हवाई क्षेत्रातलं करीअर तुम्हाला खुणावतंय का? विमान वाहतूक क्षेत्रात आज तरूणांसाठी अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. ग्राउंड स्टाफपासून पायलटपर्यंत वेगवेगळ्या पदांवर काम करता येतं. यात आवडीनुसार अभ्यासक्रम पूर्ण करून विविध पदं भूषवू शकता. विज्ञान शाखेतून बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर विमान वाहतूक क्षेत्राशी संबंधित विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येतो. या क्षेत्रात अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध आहेत. वेतनही चांगलं मिळतं. इतर उद्योगांच्या तुलनेत विमान वाहतूक उद्योगाचा बराच विस्तार झाला आहे. या क्षेत्रात करीअर करताना खालील पदांचा विचार तुम्ही करू शकता.



**कोण होणार?**

✻ कमर्शियल पायलटचा अभ्यासक्रम पूर्ण करून विमान वाहतूक कंपनीमध्ये रूजू होऊ शकता. या विषयाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम उपलब्ध आहे.

✻ हवाईसुंदरी किंवा फ्लाईट स्टीवर्ड म्हणून काम करण्यासाठी १२ वी किंवा पदवीनंतर अर्ज करता येतो. डिप्लोमा इन हॉटेल मॅनेजमेंट, टूरिझम मॅनेजमेंट, परदेशी भाषेचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यास निवडीची शक्यता जास्त असते.

✻ एअर ट्रॅफिक कंट्रोलर म्हणून काम करण्यासाठी तुमच्याकडे इलेक्ट्रॉनिक्स, टेली कम्युनिकेशन किंवा रेडिओ इंजिनिअरींगची पदवी असायला हवी. वायरलेस कम्युनिकेशन किंवा रेडिओ फिजिक्सची पदवी असेल तरी तुम्ही या पदासाठी अर्ज करू शकता.

✻ एअरक्राफ्ट मेंटेनन्स इंजिनिअरचं काम विमानाची चाचणी आणि निरिक्षण हे असतं. उड्डाण घेण्याआधी विमान सुस्थितीत आहे किंवा नाही याच्या तपासणीची जबाबदारी असते.

# आराध्याचा आदर्श



बॉलिवूड स्टार्सप्रमाणेच त्यांच्या मुलांवरही कॅमेऱ्यांची नजर असते, हे तुम्हाला माहिती असेलच. ते काय करतात, कसे बोलतात, कसे वागतात अशा प्रत्येक छोट्या-मोठ्या गोष्टीवर लक्ष ठेवले जाते. याचाच एक भाग म्हणजे आधी अभिनेत्री ऐश्वर्या रायची मुलगी आराध्याला लोक ट्रोल करायचे. कधी लोक तिच्या केसांच्या स्टाईलसाठी तर कधी आईला चिकटून राहिल्याबद्दल वाईट बोलायचे. तथापि, अलिकडे आराध्याचे काही व्हिडिओ आणि चित्रे पाहता तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होताना दिसत आहे.

अलिकडेच साजऱ्या झालेल्या ७७ व्या कान्स फिल्म फेस्टिव्हलसाठी निघताना ऐश्वर्या रायच्या हाताला दुखापत झाली होती. मात्र अशा परिस्थितीत आराध्या विमानतळावर आपल्या आईला आधार देताना दिसली. एअरपोर्टपर्यंतच नाही तर ऐश्वर्या रायची ही मुलगी कान्सच्या रेड कार्पेटवर पोहोचेपर्यंत आईचा हात धरताना दिसली. शेवटपर्यंत तिने आईची काळजी घेतली.


हाताला दुखापत झाल्यामुळे रेड कार्पेटसाठी हेवी कपडे घातलेल्या ऐश्वर्या रायला गाऊन घालून चालण्यास त्रास होत होता. अशा परिस्थितीत आराध्या आईचा हात धरुन तिला अत्यंत सावधपणे गाडीपर्यंत नेत होती. यावेळी टीमचे बाकीचे सदस्यही उपस्थित असले तरी आराध्याने आईला अजिबात त्रास होऊ दिला नाही.

एखादी १२ वर्षांची मुलगी आईची काळजी घेऊ शकते हेच या दृश्यांवरुन दिसून आले.

**विचार करा**

मुलांनो, आराध्याप्रमाणे तुम्हीही तुमच्या आईची काळजी घेत असाल. तिला बरं वाटत नसताना सोबत करत असाल. आई-बाबांची काळजी घेणे हे मुलांचे कर्तव्य असते. आराध्याप्रमाणे तुम्हीही नक्कीच ते बजावत असाल. पुढेही त्यात खंड पडू देऊ नका.

# लियामचे जादूई हात



मित्रांनो, एका दोन वर्षाच्या मुलाने मोठा विक्रम केला आहे. होय, एवढ्या लहान वयात त्याने केवळ चित्रे काढली नाहीत तर त्यांची विक्री करण्याचा विक्रमही आपल्या नावे नोंदवला आहे. चला तर मग, या चिमुकलीचे कर्तृत्व जाणून घेऊ या.

या मुलाचे नाव लियाम असून अवघ्या सहा महिन्यांचा असताना चित्रकलेकडे आकर्षित झाला. आपल्या या छोट्या राजकुमाराच्या कामगिरीबद्दल बोलताना लियामची आई सांगते की, सहा महिन्यांचा असताना त्याला पाळीव प्राण्यांचे आकर्षण वाटू लागले. हळूहळू त्यात रस वाढत गेला. सुरुवातीला ती त्याला कामात व्यस्त ठेवण्यासाठी काही रंग खेळायला देत असे. एके दिवशी त्याने रंगाचा वापर करुन असे काही रेखाटले जे खूप सुंदर दिसत होते. खरे तर तेच लियानचे पहिले पेंटिंग होते. आता लियामाने केवळ घानामध्येच नव्हे तर आंतरराष्ट्रीय माध्यमांचेही लक्ष वेधून घेतले आहे. नुकतेच त्याने काढलेल्या चित्रांचे प्रदर्शनही भरवण्यात आले होते. त्यावेळी लियामाची १० पेंटिंग्ज लावण्यात आली होती, त्यापैकी नऊ पेंटिंग लोकांनी खरेदी केली.

**अचिव्हर**

गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सनुसार, जगातील सर्वात तरुण कलाकार होण्याचा विक्रम मिळाल्यानंतर छोटा लियाम अनेकांसाठी प्रेरणास्थान बनला आहे. घाना हा मागासलेला आणि गरीब देश आहे. मात्र तिथे लियामसारखा सिद्धहस्त कलाकार जन्मल्यामुळे लोकांसाठी तो अनोखा संदेश असल्याचे मानले जात आहे.

# दुधाची ॲलर्जी आहे?

दुधाची ॲलर्जी असते. त्यांना दुग्धजन्य पदार्थ खाल्ल्याने त्रास होऊ शकतो. दही, पनीर, लोणी यासारखे अनेक पदार्थ दुधापासून बनलेले असतात. त्यामुळे दुधाची ॲलर्जी असेल तर आपण काय खात आहोत, याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. त्यातच लहान मुलांना कॅल्शियम आणि ड जीवनसत्त्वाची गरज असते. हे घटक दुग्धजन्य पदार्थांपासून बनतात. अशा परिस्थितीत मुलांना दुधाची ॲलर्जी असेल तर काय करायला हवं हे जाणून घेणं गरजेचं ठरेल.



एखाद्या पदार्थाच्या ॲलर्जीमुळे शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीवर परिणाम होतो. त्या पदार्थातल्या प्रथिनांसोबत रोगप्रतिकारक शक्तीचा संपर्क येतो, तेव्हा हे घडतं. गाईच्या दुधाची ॲलर्जी असणाऱ्यांच्या रोगप्रतिकारक शक्तीचा संपर्क दुग्धजन्य पदार्थातील एका किंवा जास्त प्रथिनांशी येतो तेव्हा ही प्रथिनं हानीकारक असल्याची जाणीव शरीराला होते. अशा वेळी रोगप्रतिकारक शक्ती सक्रिय होते. हानीकारक घटकांचा पाडाव करण्यासाठी सज्ज होते. या प्रक्रियेत विशिष्ट प्रकारची रसायनं स्रवतात आणि प्रतिक्रिया उमटते. याचा त्रास शरीराला होतो.

**हेल्थवेल्थ**

हे लक्षात घेऊन दुधाची ॲलर्जी असेल तर दुग्धजन्य पदार्थ पूर्णपणे टाळले पाहिजेत. त्याच बरोबर कोणताही पदार्थ विकत घेण्याआधी त्यातल्या घटक पदार्थांची माहिती करून घ्यायला हवी. केवळ सँडविचमधलं चीज काढून टाकून भागणार नाही. आज दुधाला अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. त्या दृष्टीने पनीरऐवजी टोफू खाता येतं. खरं तर दुग्धजन्य पदार्थ पूर्णपणे टाळता येतात. असं केलं तर दुधाची ॲलर्जी असूनही तुम्ही निरोगी राहू शकता.

# फोटो एडीट करण्यासाठी...

आपण काढलेले फोटो फेसबुक, व्हॉट्स ॲप, इन्स्टाग्रामसारख्या सोशल मिडियावर शेअर करायचे असतात. अशा वेळी फोटो एडिटिंग ॲपची गरज लागते. गुगल ॲप स्टोअरवर फोटो एडिटिंग ॲप्स मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यातल्याच काही हटके ॲप्सची माहिती घेऊ या.

✻ ॲव्हिअरी हे ॲप खूप वेगळं आहे. या ॲपचा वापर केल्यानंतर एक्स्ट्रा फिल्टर आणि ब्युटिफिकेशन मोड वापरण्याची गरज लागत नाही.




✻ स्नॅपसिड हे आयओएस आणि अँड्रॉइड अशा दोन्ही ओएस सिस्टिम्सवर उपलब्ध आहे. हे ॲप डाउनलोड करून तुम्ही झटपट फोटो एडिट करू शकता. यामुळे सोशल मिडियावर फोटो पटकन शेअर करता येतात.

**ॲप वर्ल्ड**

✻ फोटो शेअरिंग तसंच एडिटिंगसाठी व्हीएससीओ या ॲपला प्रचंड मागणी आहे. या ॲपमुळे फोटो अगदी झटपट एडिट करता येतात. याचा वापर करायला फार वेळ लागत नाही. त्यामुळे हे ॲप खूपच लोकप्रिय ठरलं आहे.

✻ प्रिज्मा फोटो एडिटर हे ॲप तुमच्या फोटोला कलात्मक रूप देतं. या ॲपमध्ये बरेच नवे इफेक्ट्स आहेत. त्यामुळे तुम्ही फोटोंना वेगवेगळे इफेक्ट्स देऊ शकता. तसंच यावर सतत नवनवे अपडेट्स येत असतात.

# अनोखं युएई

युनायटेड अरब अमिरात म्हणजे यूएई हा मध्यपूर्व आशियातला एक देश आहे. अबुधाबी ही त्याची राजधानी आहे. हे या देशातलं सर्वात मोठं शहरही आहे. यूएई सात अमिरातींनी मिळून बनलेला देश आहे. अबुधाबी, अजमन, दुबई, फुजाइराह, रास-अल खैमाह, शारजाह, उम-अल-क्युवेन अशा या सात अमिराती आहेत. दुबई ही इथली सर्वात प्रसिद्ध अमिराती आहे. इथल्या राज्यकर्त्यांना 'आमीर' असं म्हटलं जात असल्याने यूएईमधल्या शहरांना आमिराती असं म्हणतात. हा देश संयुक्त आहे. इथल्या एका अमिरातीतून दुसऱ्या अमिरातीत जाणं खूप सोपं असतं. एका शहरातून दुसऱ्या शहरात जाण्यासारखंच ते असतं. अरबी ही या



देशाची अधिकृत भाषा आहे.

**सफर देशांची**

युएईमध्ये विविध देशातले लोक राहतात. इथे भारतीयांची संख्या बरीच जास्त आहे. युएईमध्ये राहणारे ८० टक्के लोक बाहेरचे आहेत तर केवळ २० टक्के स्थानिक आहेत. इथे विविध संस्कृतींचा मिलाफ पहायला मिळतो. इथे जवळपास २०० देशांमधले लोक राहतात. आपल्याकडे तुम्ही रविवारी मस्त झोप काढता. पण इथल्या मुलांना रविवारी शाळेत जावं लागतं. त्यांना शुक्रवारी किंवा शुक्रवार-शनिवार सुटी असते. आपल्याकडे सोमवारपासून आठवडा सुरू होत असला तरी अमिरातीतला आठवडा रविवारी सुरू होतो. शुक्रवार हा इथला विशेष दिवस असल्याने या दिवशी बऱ्याच ठिकाणी सुटी दिली जाते. दुबईमध्ये बरीच मानवनिर्मित बेटं आहेत. इथली अनेक बेटं एखाद्या शहरासारखीच वाटतात. बुर्ज खलिफा ही जगातली सर्वात उंच इमारत हे दुबईचं मुख्य आकर्षण आहे. दुबईमध्ये मोठ्या संख्येने पर्यटक येतात. व्यापाराचंही हे मोठं केंद्र आहे. युएई हा वाळवंटी भाग असल्याने इथे तीव्र उन्हाळा असतो.

# फोर्टबॉल आणि मिनी क्रिकेट

जॉन यी यांनी फोर्टबॉल नावाच्या खेळाचा शोध लावला. यात किल्ला बांधायचा असतो. तसंच बॉलने खेळायचंही असतं. या खेळात दोन संघ असतात. प्रत्येक संघात सहा खेळाडू असतात. हा खेळ खूप मजेशीर आहे. यात तुमच्या शारीरिक क्षमतेचा कस लागतो. तुमचं कौशल्य पणाला लागतं. हा खेळ चौकोनी मैदानात खेळला जातो. त्यासाठी ५० बाय ५० फुटांचं मैदान असावं लागतं. किल्ला बांधण्यासाठी छोटीटेबलं, बॉक्स, सेलोटेप, गम अशा वस्तू लागतात. या शिवाय तीन मऊ चेंडूही गरजेचे असतात.



**फन टाईम**

मिनी क्रिकेट हा प्रकार इंग्लंडमध्ये लोकप्रिय आहे. या खेळात गुडघ्यांवर बसून क्रिकेट खेळायचं असतं. २०१० मध्ये या खेळाचा शोध लावण्यात आला. या खेळात दोन संघ असतात. प्रत्येक संघात सहा खेळाडू असतात. या खेळातील बाकी सर्व नियम क्रिकेटप्रमाणेच असतात.


**जिज्ञासा**

## ओळखा पाहू...

१) व्हायरसचा शोध कोणी लावला?
२) कोणत्या घटकामुळे दह्याला आंबटपणा येतो?
३) यीस्ट हा कोणत्या जीवनसत्त्वाचा महत्त्वाचा स्रोत आहे?
४) हाडांच्या अभ्यासाला काय म्हणतात?
५) अन्न चिकटू नये यासाठी नॉनस्टिक भांड्यांना कोणत्या घटकाचा थर दिलेला असतो?
६) भारतात ऊस संशोधन संस्था कोणत्या शहरात आहे?
७) गरमपानी अभयारण्य कुठल्या राज्यात आहे?
८) १८२९ मध्ये भारतातून सती प्रथेचं उच्चाटन करणारा गव्हर्नर जनरल कोण?
९) सिनेगॉग हे कोणत्या धर्मियांचं प्रार्थनास्थळ आहे?
१०) २०१८ ची आशियाई क्रीडा स्पर्धा कोणत्या देशात संपन्न झाली?

उत्तर : १) इवानोव्हस्की, २) लॅक्टिक आम्ल, ३) ब जीवनसत्त्व, ४) ऑस्टिओलॉजी, ५) टेफ्लॉन, ६) कोइम्बतूर, ७) आसाम, ८) लॉर्ड विल्यम बेंटिक, ९) ज्यू, १०) इंडोनेशिया.

**ठिपके जुळवा**



# पेन, पेन्सीलशी दोस्ती गरजेची

तुम्ही मुले तंत्रज्ञानाने वेढलेली आहात. तुम्ही की बोर्ड वापरून प्रभावीपणे लिहू शकता, असे गृहीत धरले जाते. परंतु अलीकडील संशोधन सूचित करते की, हे खरे नाही. मुले कागद आणि पेन किंवा पेन्सिल वापरून अधिक चांगले लिहू शकतात. अलिकडेच प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर आणि की बोर्ड लेखन याचा तौलनिक विचार केला गेला. त्यानुसार लॅपटॉप वापरून कथा लिहिण्याच्या तुलनेत विद्यार्थ्यांनी कागद आणि पेन्सिल वापरून अत्यंत सहजतेने कथा लिहिलेल्या आढळल्या. त्यात असेही आढळून आले की, मुलांनी दीर्घ आणि उच्च दर्जाचे हस्तलिखित ग्रंथही तयार केले. ते विचार, शब्दसंग्रह, शब्दलेखन आणि विरामचिन्हांसह अन्य दहा निकषांवर आधारित तपासले गेले. विश्लेषणात असे दिसून आले आहे की, प्राथमिक काळात विद्यार्थी की बोर्ड वापरण्यापेक्षा कागद आणि पेन किंवा पेन्सिल वापरून उच्च दर्जाचे लिहू शकतात.

**स्टडी टिप्स**

मुलांनो, अनेक देशांमध्ये मुलांना प्रथम हातानेच लिहायला शिकवले जाते. हस्तलेखनात प्रभुत्व मिळविल्यानंतरच की बोर्ड लेखन हे अतिरिक्त कौशल्य म्हणून जोडले जाते. अभ्यास दर्शवितो की, शालेय शिक्षणाच्या पहिल्या वर्षांमध्ये हस्तलेखन शिकणे हे चांगल्या शब्दरचनेशी संबंधित आहे. शालेय शिक्षणाच्या प्राथमिक आणि नंतरच्या वर्षांमध्ये चांगले आणि पटकन लिहिण्याची क्षमता वाढते. मजकूर तयार करण्यासाठी हस्तलेखन वापरल्याने माहिती शिकण्याची आणि लक्षात ठेवण्याची क्षमताही वाढते. अर्थात असे असले तरी, तुम्हा मुलांना की बोर्ड कसा वापरायचा हे देखील शिकण्याची गरज आहे. मोठे होता तसतसे तुम्हाला अभ्यास, काम आणि लेखनासाठी की बोर्ड वापरण्याची आवश्यकता असेलच. की बोर्डवरील कळांचे स्थान शिकणे, त्यांना कौशल्यांसह एकत्रित करणे आणि योग्य क्रमाने कळ दाबण्यासाठी बोटे हलवणे यामध्येही कौशल्य विकसित होते. पण ते ग्रहण करताना वा केल्यानंतर पेन किंवा पेन्सिलने लिहिण्याची सवय मागे न पडण्याची काळजी घ्या.

**चित्र रंगवा**



**दोस्त हे मस्त**

## ऑर्चिड मँटिस

ऑर्चिड मँटिस नावाचा एक किटक आहे. फुलपाखरू कुटुंबाबाहेरचा हा सर्वात सुंदर असा किटक आहे. तो वेगवेगळ्या रंगांमध्ये आढळतो. विशिष्ट प्रकारच्या फुलावर ते राहतात आणि त्या फुलासारखेच त्यांचे रंग होतात. त्यांचे पाय फुलांच्या पाकळ्यांप्रमाणे दिसतात. त्यामुळेच हा एखादा किटक आहे हे पटकन कळतही नाही.



**खादाडी**

## ककुंबर कप्स

ककुंबर कप्स बनवण्यासाठी थोड्या जाडसर काकड्या घ्या. त्या नीट सोलून घ्या. त्यानंतर त्यांचे अर्धा किंवा पाव भाग करून घ्या. आता आतला गर काढून टाका आणि त्यात डिप, चीज, एखादं सॅलड किंवा आवडीची फळं असं काहीही घाला. झाला तुमचा ककुंबर कप तयार. आता मस्तपैकी खा.



**लाईफस्टाईल**

## सॅनिटायझर ठरतात घातक

हात स्वच्छ करण्यासाठी आपण सॅनिटायझरचा वापर करतो. पण हे सॅनिटायझर तुम्हाला आजारी पाडू शकतात. बऱ्याच सॅनिटायझरमध्ये अल्कोहोल असतं. यामुळे हातांवरचे बॅक्टेरिया मरत नाहीत. त्यापेक्षा साबणाने हात धुणं जास्त सुरक्षित असतं. आजकाल बरीच लहान मुलंही हॅण्ड सॅनिटायझर वापरतात. त्यामुळे पालकांना विचारूनच त्याचा वापर करायला हवा.




**योगा टाईम**

## फुलपाखरू

हे आसन करण्यासाठी मांडी घालून बसा. पाठीचा कणा ताठ ठेवा. मांड्यांचा बाहेरचा भाग म्हणजे फुलपाखराचे पंख आहेत असा विचार करा आणि खालीवर हलवा. यामुळे मांडीचे स्नायू लवचिक होतात.






# रायगडातही ढोल पथकाचा शंखनाद

**पारंपरिक सण म्हटले की, पारंपरिक वाद्य असे चित्र सहज डोळ्यासमोर येते. आता तर पालखी, मिरवणुकांमधून पारंपरिक वाद्यांना अधिक पसंती मिळत आहे. आधुनिक वाद्यांचा साज श्रोत्यांच्या मनात उतरत असला तरी पांरपरिक वाद्यांचा नाद मात्र स्फुरण देणारा ठरत आहे. आजकाल मिरवणुकांमध्ये नाशिक ढोल पथकांचा वावर दिवसेंदिवस वाढत आहे. ध्वनीक्षेपकाच्या आवाजाच्या मर्यादेबाहेर हे वाद्य असल्याने आणि या वाद्याच्या गजराने ऐतिहासिक माहोल तयार होत असल्याने रायगड जिल्ह्यातदेखील ढोल पथकांच्या शंखनादाला अधिक पसंती मिळत आहे. पूर्वी लेझीम पथकांसोबत असणाऱ्या ढोल पथकांमध्ये पुरूषांचे वर्चस्व होते. आता या ढोलपथकांवर महिलांनी देखील आपले अस्तित्व निर्माण केले आहे.**

प्रमोद जाधव

मुंबई, पुण्यासारख्या मोठ्या शहरापुरता मर्यादीत असलेल्या ढोल पथकांचा शंखनाद आता रायगड जिल्ह्यातही घुमत आहे. ऊर्जा, शक्ती, उत्साह देणाऱ्या या वाद्यांचा क्रेझ गेल्या दहा वर्षात रायगड जिल्ह्यात वाढत आहे. जिल्ह्यामध्ये ३२ हून अधिक ढोल पथके आहेत. गणेशोत्सवासह गुढीपाडवा व अन्य समारंभामध्ये तरुण पिढीच्या माध्यमातून मराठी संस्कृती जपण्याचे काम ढोल पथकांद्वारे केले जात आहे.

ढोल पथकाची सुरुवात पुणे शहरातून झाली. ग्रामीण भागात राहणाऱ्या मंडळींनी त्याची सुरुवात केली. पुण्यातील आप्पा पेंडसे यांचा त्यामध्ये सिंहाचा वाटा राहिला आहे. त्यांच्या सोबत ताशावादनकार म्हणून गुलाबराव कांबळे यांचे नाव घेणे वावगे ठरणार नाही. सण उत्सव तसेच विशेष कार्यक्रमात ढोल आणि ताशा ही मंगलवाद्ये म्हणून वाजविण्याची पद्धती प्रचलित आहे. गणेशोत्सवात ढोल ताशा वाजविण्याची पद्धत महाराष्ट्रात रुजूली आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये पुर्वी मोठ्या समारंभामध्ये पुणे येथून ढोल पथकांना पाचारण केले जात होते. साखरचौथ, दहा दिवसाच्या गणेशोत्सावात मुंबई व पुणे येथील पथक रायगड जिल्ह्यात येत होते. रायगड जिल्ह्यातही स्वतःची ढोल पथके असावी, ही संकल्पना येथील तरुणांनी मांडली. शेकापचे नेते आ. जयंत पाटील, अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, सरखेल कान्होजी आंग्रे यांचे वंशज रघुजी राजे आंग्रे, शेकापच्या महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील तसेच हिंदू जनजागृती समितीच्या पुढाकाराने ही संकल्पना प्रत्यक्षात उतरली. अलिबागध्ये पहिल्यांदाच कुलाबा ढोल पथक तयार झाले. २०१२ पासून अलिबागमध्ये ढोल पथकाला सुरुवात झाली. सुरुवातीला या पथकामध्ये पुरुषांची मक्तेदारी होती. पुरुषच हे वाद्य वाजवत होते. मात्र कालांतराने यात बदल होत गेला. महिलादेखील यामध्ये सहभागी झाल्या.










त्यांनीदेखील ढोल पथक वाजविण्यास सुरुवात केली. आज पुरुषांच्या बरोबरीने कित्येक तास तरुणी महिला हे वाद्य वाजवित असल्याचे चित्र पहावयात मिळत आहे.

सुरुवातीला अलिबागमध्ये फक्त गुढीपाडव्याला ढोल ताशांचा वाद्यांच्या सूर ऐकायला मिळत होता. मात्र शहरी भागासह ग्रामीण भागातील काही महाविद्यालयीन तरुणांनी या मराठी संस्कृतीचे जतन करण्यासाठी पाऊल पुढे टाकले. वेगवेगळ्या महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थींनी एकत्र येऊन ढोल पथकांचा सराव करू लागले. दोन ते तीन तास हा सराव केला जात आहे. हे वाद्य वाजविण्यासाठी तरुणाई पुढे येऊ लागल्याने आज ८० हून अधिक ढोल, १७ ताशा, ११ ध्वज आणि तीन टोल अलिबागमध्ये आहेत. अलिबागमध्ये आज कुलाबा ढोल पथकांसह मंगलमुर्ती ढोल पथक उभे असून रायगड जिल्ह्यात ३२ हून अधिक ढोल पथक कार्यरत आहेत. या ढोल पथकांमध्ये ८ वर्षापासून ६० वर्षापर्यंतीची मंडळी काम करीत आहेत. त्यामध्ये दिलीप नवरे, रोहन गुरव, अर्जून नागवेकर, तनया मंचेकर, सात्वीक नवरे, मिताली चिंबूलकर, आदिती ठाकूर, भक्ती राऊत, निल वारगे, रितेश गुरव, शुभम नखाते, आकाश चिमणे सारखी अनेक तरुण मंडळी या पथकामध्ये सहभागी आहेत. ढोल ताशांच्या वाद्यांच्या आवाजाने एक वेगळा उत्साह व आनंद मिळतो. त्यामुळे ढोल ताशांचा आवाज झाल्यावर तो जवळ जाऊन ऐकण्याचा व बघण्याचा आनंद प्रेमी मनमुरादपणे घेत आहेत.

ढोल ताशांच्या वाद्यांनी मराठी संस्कृतीचे जतन करण्याचे काम करीत असताना, या पथकांमार्फत सामाजिक बांधिलकी जपण्याचे कामही केले जात आहे. कोरोनाकाळासह निसर्ग व चक्री वादळामध्ये नुकसानग्रस्तांना मदतीचा हात देण्याचे काम या पथकाने केले आहे.

फक्त मनोरंजन, उत्साह न देता गरजू, गरीब, पिडीतांना उभे राहण्याचे बळही ढोल ताशा पथक देत असल्याचे स्पष्ट होऊ लागले आहे. **

# प्रतिभावान संगीताचा सन्मान

राम कोंडीलकर

सुप्रसिद्ध अकॉर्डियन वादक, कुशल संगीत संयोजक आणि प्रतिभाशाली संगीतकार अरुण पौडवाल यांच्या स्मृती जपणारा आणि कुठलाही बडेजावपणा न आणता अत्यंत साधेपणाने घरगुती मंगलमय वातावरणात गेली २७ वर्षे साजरा होणारा 'स्व. अरुण पौडवाल यांच्या स्मृती प्रित्यर्थ देण्यात येणारा ''कृतज्ञता गौरव पुरस्कार'' नुकताच प्रसिद्ध गायक संगीतकार त्यागराज खाडिलकर यांना सुप्रसिद्ध पार्श्वगायिका पद्मश्री अनुराधाजी पौडवाल यांच्या हस्ते आणि कवीता पौडवाल-तुळपुळे व पौडवाल कुटुंबियांच्या उपस्थितीत, त्यांच्या खार येथील निवास्थानी प्रदान करण्यात आला. ५१ हजार रोख रुपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

या गौरव सन्मानाची संकल्पना विशद करताना सुप्रसिद्ध पार्श्वगायिका पद्मश्री अनुराधा पौडवाल म्हणाल्या, ''अरुणजी हे स्वतः एक अतिशय उच्चकोटीचे संगीतकार - म्युझिशियन होते. त्यामुळे कलाकारांचा योग्य तो सन्मान व्हायला पाहिजे. बहुतेकवेळा त्यांचे फॅन्स काही सत्कार सोहळे करीत असतात. पण आर्टिस्टने एका आर्टिस्टचा सन्मान करणे याला जास्त महत्व आहे. आजचा हा २७ वा सोहळा आहे. याच्या आधी ज्या ज्या कलाकारांनी अरुणजींसोबत काम केले आहे, ज्यांना त्यांच्या कामाची पद्धत, त्यांचा स्वभाव माहीत आहे अशा कलावंतांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. यावेळी त्यागराज यांची निवड करण्यामागे विशेष कारण आहे. काही महिन्यापूर्वी मी त्यांच्या एका कार्यक्रमासाठी विशेष प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.







त्यांनी दिव्यांग मुलांना घेऊन एक अल्बम केला होता. अशा मुलांसोबत केलेला हा जगातील एकमेव असा सुंदर अल्बम आहे, असं मला वाटतंय. इतकं सुंदर संगीत आणि संयोजन करून त्यांनी पूर्ण न्याय दिला आहे. दुसऱ्या आर्टिस्टला पुढे आणावं ही गोष्ट, ही कल्पना फार महत्वाची आहे. त्यांच्यातील ही गोष्ट मनाला भिडली आणि म्हणूनच त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली.'' याप्रसंगी आपल्या भावना व्यक्त करताना गायक संगीतकार त्यागराज खाडिलकर म्हणाले, ''माझ्यासाठी हा अत्यंत महत्वाचा पुरस्कार आहे. गेल्या २६ वर्षातील पुरस्कार्थींची यादी पाहिल्यावर खरंतर मी थरारून गेलो. अरुणजींच्या नावाचा हा पुरस्कार मिळविणाऱ्यांच्या या मांदियाळीमध्ये माझीही नोंद झाली हे माझ्यासाठी खूप महत्त्वाचं आहे. अरुणजींच्या संगीताचे आणि संगीतसंयोजनाचे अनेक संस्कार माझ्यावर झाले आहेत. माझ्या गाण्यांतून ते आपल्याला पदोपदी जाणवतात सुद्धा. या प्रतिभावान संगीतकाराची गाणी आजही तितक्याच लोकप्रियतेने गायली जातात. त्यांच्या नावाचा पुरस्कार लाभावा आणि तोही साक्षात पद्मश्री अनुराधाताई यांच्या हस्ते ही माझ्यासाठी विशेष भाग्याची आणि प्रेरणादाई गोष्ट आहे.

हा सोहळा अनुराधा पौडवाल यांच्या निवास्थानी स्थित दक्षिणेश्वरी काली माता मंदिरात संपन्न झाला. याच वेळी 'स्वरकुल ट्रस्ट'तर्फे सादर झालेल्या ''तिमीरातुनी तेजाकडे'' या भारतातील पहिल्या दिव्यांग कलाकारांनी गायलेल्या अल्बममधील अतुल कसबे आणि विजयालक्ष्मी यादव या दोन दिव्यांग गायकांनादेखील अनुराधाजींच्या हस्ते सन्मानित करण्यात आले! या अंध गायकांनी गायलेल्या महाराष्ट्रातील नवोदित गीतकरांच्या त्यागराजजींनी स्वरबद्ध केलेल्या रचनांना उपस्थितांचा भरभरून प्रतिसाद दिला!

याप्रसंगी त्यागराजजींनी दिव्यांग गायकांच्या हिंदी अलबमची, तसेच अनुराधा पौडवाल यांच्यासोबत 'भजनगंगा' या हिंदी कार्यक्रमाची योजना जाहीर केली. या कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन स्व. अरुण पौडवाल यांचे निस्सीम चाहते आणि जाणकार संगीतदर्दी प्रसिद्ध गायक श्री चंद्रशेखर महामुनी यांनी केले. **

# चित्रनगरीची 'दुर्गा खोटे'

श्रीराम शेटये

दुर्गा खोटे यांचा जन्म अत्यंत सधन कुटूंबात झाला होता. त्यांचे वडील सॉलिसिटर पांडुरंग सीताराम लाड यांचे नाटकावर फार प्रेम होते. त्यांच्या अनेक पिढ्या मुंबईत होत्या. त्या काळात मुंबईत गंधर्व नाटक कंपनीची नाटके होत असत. नारायण राजहंस म्हणजेच बालगंधर्व यांचे आणि दुर्गा खोटे यांच्या वडीलांचे खुप घनिष्ठ संबंध होते. दुर्गा खोटे यांच्या वडीलांना सर्व लाड साहेब म्हणूनच ओळखत असत. दुर्गा पाच सहा वर्षाची असल्यापासुनच वडील तीला नाटक पहायला नेत असत.

बालगंधर्व अनेक वेळा दुर्गा खोटे यांच्या घरी रहायला येत असत. ते दुर्गा खोटे यांच्या आईला आपली बहिन मानीत असत तीला ते अक्का म्हणायचे. वडील गंधर्व कंपनीला अनेकवळा अडीअडचणीलाही मदत करीत असत. त्यांचे नाटकावर एवढे प्रेम होते की गणपतराव बोडस गंधर्व कंपनीतून बाहेर पडले तेव्हा ते अक्षरक्षः रडले होते.

एकदा छोटी दुर्गा बालगंधर्वांना म्हणाली, ''मला एकदा तरी नाटकात काम द्या.''

ते म्हणाले, '' नको पोरी हा रंग एकदा तोंडाला लागला की जन्मभर निघायचा नाही.''

छोट्याशा दुर्गाला नाटक मनापासुन आवडायचे ती त्यांना म्हणायची, ''मला छोटेसे एखाद्या दासीचे तरी काम द्या. एक पद दिले तरी चालेल.''

ते म्हणत, ''छे: छे: हा रंग तोंडाला लावू नकोस. कधीच पुसला जायचा नाही.

दुर्गा खोटे यांना नाटकात काम करायला घरातून कोणतीही बंधने नव्हती. दुर्गा नाटकाची पदे म्हणत असे. कॉलेजच्या नाटकातून काम करीत असे. परंतु त्यांच्या कॉलेजात इंग्रजी नाटके करत असत. त्या काळात इंग्रजांची सत्ता होती. सगळ्या संस्कृतीवर 'व्हिक्टोरियन' संस्कृतीचा परिणाम झाला होता. दुर्गाबाईंचे शिक्षण, बोलणे, चालणे यावर इंग्रज संस्कृतीची छाप पडली होती. त्याचा अभिमान वाटायचा इंग्रजी येत नसेल तर कमीपणा वाटायचा असा तो काळ होता.

जे. बी. वाडीया हे दुर्गा खोटे यांच्या मोठ्या बहिनीच्या कॉलेजमधील वर्गमित्र होते.

त्यांनी दुर्गा खोटे यांच्या बहिणीला चित्रपटात काम करणार काय? म्हणून विचारणा केली होती.

तेव्हा मी करणार नाही परंतू माझी छोटी बहिन दुर्गा चित्रपटात काम करत असेल तर विचारते. तिला हौस आहे.दुर्गा खोटे यांनी मागचा पुढचा विचार न करता होकार दिला. परंतू त्या काळात चित्रपटात काम करणे हिन पणाचे समजले जाई.समाजाचा नटीकडे बघण्याचा दृष्टीकोन चांगला नव्हता. हे वेश्यावृत्तीचे काम समजले जाई. अशा कठोर



काळात दुर्गा खोटे यांच्या सारख्या श्रीमंत उच्च विद्याविभुषित सिने चित्रपटात काम करणे हे फार मोठे धाडसच होते.

मग चित्रपटात काम करण्याचा आपला निर्णय त्यांनी आई वडीलांना सांगितला. ते म्हणाले ,''तूला हौस असेल तर चित्रपटात काम कर.''

तांत्रिक दृष्टीने तो दुर्गाबाईंचा पहिलावहिला चित्रपट अगदीच भिकार होता. महाराष्ट्रीय लोकांनी दुर्गा खोटे यांना एवढ्या शिव्या घातल्या की काही विचारु नका. ते म्हणाले हिला कोणी हा उद्योग सांगितला? ही चांगल्या घराण्यातली मुलगी, मोठ्या घराण्यातली सुन आणि अशा भिकार चित्रपटात काम करते. दुर्गाबाईंना या बोलण्याचा अतोनात त्रास झाला. एकदा व्ही. शांताराम हा चित्रपट पहायला गेले. लाडांच्या मुलीने काम केलेल्या चित्रपटात एवढे काय भयंकर आहे ते बघण्यासाठी. पण का कोणास ठाऊक त्यांना दुर्गा खोटे यांचे काम आवडले. त्यावेळी ते 'अयोध्येचा राजा' या चित्रपटात तारामतीच्या भुमिकेसाठी योग्य नटी निवडण्याकरीता मुंबईत आले होते. गोविंदराव टेंबे त्या वेळी शांतारामबापू बरोबर काम करीत असत. शांतारामबापू गोविंदरावांना म्हणाले,''तुम्ही लाड साहेबांच्या मुलीला विचारा.''

शांतारामबापू व गोविंदराव दोघांनी मोठा धीर करून दुर्गाबाईंना चित्रपटात काम करण्याबाबत विचारले. दुर्गाबाई म्हणाल्या, ''नाही आता सिनेमात म्हणून काम करायचे नाही असे मी ठरविलें आहे.''

शांतारामबापू म्हणाले, ''तुम्हाला चांगल्या चित्रपटात काम करायला आवडेल का?''

दुर्गा खोटे म्हणाल्या, ''मला खूप करायला आवडेल पण मला पहिला वाईट अनुभव पहाता भिती वाटते. हे मला जमेल का?मनातून मात्र काम करायची ईच्छा आहे. ''गोविंदराव म्हणाले आपण लाड साहेबांनाच विचारु पण कोणाची हिम्मत होईना. तेव्हा स्वत: दुर्गाबाईंनीच वडीलांना याबाबत विचारले. वडील म्हणाले,'' खबरदार परत चित्रपटात काम केलेस तर , झाली तेवढी शोभा कमी झाली का?

दुर्गाबाई म्हणाल्या, ''पप्पा मला एक संधी द्या ही संधी हूकली तर परत संधी मिळायची नाही. ''

त्यांनी परवानगी दिली व विचारले



,''कोणाबर काम करणार आहेस?''

दुर्गाबाई म्हणाल्या उद्या ती मंडळी येईल.

दुसऱ्या दिवशी शांतारामबापू व गोविंदराव आले. दुर्गाबाईंच्या वडीलांनी त्यांना अनेक अटी घातल्या. वडीलांची परवानगी मिळाल्यावर दुर्गा खोटे यांच्या तालमी सुरू झाल्या. शांतारामबापूंनी अभिनय शिकण्यासाठी मोठमोठे आरसे समोर ठेवले होते. दुर्गाबाईंनी खुप मेहनत घेतली आणि अयोध्येचा राजा या पहिल्या मराठी बोलपटात त्यांची भुमिका साकार झाली. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. दुर्गा खोटे यांनी अनेक हिंदी आणि मराठी चित्रपटांत काम करून आपल नाव चित्रपट जगतावर कोरले.

'अयोध्येचा राजा', 'माया मच्छिंद्र' , 'अमर ज्योती ', 'हम एक है' यासारख्या प्रभातच्या चित्रपटात काम केल्यानंतर प्रभात कंपनी दुर्गाबाईंनी सोडली. कोल्हापुरात प्रतिभा चित्र मध्ये दाखल झाल्या. नंतर त्यांनी स्वत: एक चित्रपट निर्माण केला. त्याचे नाव 'सौंगडी' पण त्याच दरम्यान दुर्गा खोटे यांच्या २६ वर्षाच्या ऐन तरूण वयात त्यांना वैधव्य आले. पाठोपाठ वडीलही वारले. सर्व घडी विस्कटली.

पण तरीही परत भरारी घेऊन दुर्गाबाई फिनीक्स पक्षाप्रमाणे उभ्या राहिल्या. आचार्य अत्र्यांच्या, 'पायाची दासी' या चित्रपटात त्यांनी काम केले. हिंदी आणि मराठी सिनेविश्वात दुर्गाबाईंचे नाव आदराने घेतले जाते. **

# ओल्या काजुगरांचा हंगाम संपला

**। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।**

ओल्या काजुगरांचा हंगाम संपल्याने विक्रीसाठी विविध भागातून येणाऱ्या आदिवासी महिला देखील मुरूड बाजारपेठेत दिसून येत नाहीत. मात्र भाजी मार्केट बाहेर गावागावातून महिला हापूस, रायवळी आंबे विक्रीस आणत आहेत असे दिसून येत आहे. कडक उन्हाच्या काहिलीने सर्वच हैराण झाले असून वातावरणात तापमान वाढते आहे. मुरूड शहरात सर्वच अंतर्गत रस्ते डांबरी झाल्याने वातावरण आधिक तापत असून उष्णतेची वाफा तोंडावर येत आहेत.

यंदा एप्रिल, मे महिन्यात रोहा, मुरूड तालुक्यातील ग्रामीण भागातून आदिवासी महिलांनी ओले काजूगर, मोठ्या प्रमाणावर मुरूड मार्केटमध्ये विक्रीस आणले होते.

१२० ते १३० रुपये शेकडा दर काजुगराला मिळत होता. नागरिक आणि पर्यटकांनीदेखील ओले काजूगर मोठ्या प्रमाणावर खरेदी केल्याचे दिसून आले. रोहे तालुक्यातील मुचणे, कांडने, शुरूड तालुक्यातील नागशेत, शिघ्रे आदिवासी वाडी येथून देखील मे महिन्याच्या अखेरपर्यंत महिला काजूगर विक्रीस आणत होत्या. सध्या मुरूड मार्केटमध्ये करवंद, जांभळे असा रानमेवा विक्रीस येताना दिसून येत आहेत.

## आंबे, रानमेवा मुबलक उपलब्ध

हापूस आंब्याचे दरदेखील खाली आले आहेत. हापूस आंबे ३०० रुपये डझनाने मिळत आहेत. करवंद, जांभळे, कोकम आदी रानमेवा मार्केटमध्ये दिसून येत आहे. तापमान ४१ अंशावर पोहोचल्याने गावठी भाज्यादेखील सुकून जात असल्याचे दिसत आहे.

# कोकण पदवीधरसाठी शिवसेनेच्या शिंदे गटात इच्छुकांची रस्सीखेच

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कोकण पदवीधर निवडणूकीत नामनिर्देशन अर्ज दाखल करण्यासाठी दोन दिवस शिल्लक असताना अद्याप शिवसेनेने (शिंदे गट) उमेदवार निश्चित केला नाही. शिवसेनेचे सचिव संजय मोरे हे इच्छुक असताना पनवेलमधील शिवसेनेच्या गटाने मंगेश रानवडे यांच्या नावाची शिफारस केली आहे. त्यामुळे शिवसेनेत ताळमेळ नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

कोकण पदवीधर मतदारसंघात मागील निवडणूकीपेक्षा दुप्पटीने मतदारांची संख्या वाढली असून सध्या कोकण पदवीधर मतदारसंघात २ लाख ३ हजार मतदारांची नोंद झाली आहे. रायगड जिल्ह्यात ५३ हजार मतदार असून यापैकी २० हजार मतदार पनवेलमधील आहेत. तसेच ठाणे जिल्ह्यात ९५ हजार मतदार आहेत. यापूर्वीच्या निवडणूकीत निरंजन डावखरे यांना ३२ हजार पदवीधरांनी पसंती दर्शविल्याने ते या मतदारसंघातून आमदार झाले. मात्र त्यावेळेस एक लाखावर मतदार संख्या होती. सध्या दुप्पटीपेक्षा जास्त मतदार या मतदारसंघात वाढले आहेत. मतदारांप्रमाणे इच्छुक उमेदवारांची संख्या मतदारसंघात मोठी झाली आहे. अद्याप या मतदारसंघात चौरंगी लढत होणार की दुरंगी की तिरंगी हे अद्याप ठरलेले नाही. ७ जून ही या निवडणूकीत अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख असली तरी शिवसेनेचा एबी फॉर्म संजय मोरे यांना मिळणार की पनवेलचे इच्छुक असलेल्या मंगेश रानवडे यांना मिळणार असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## e-Tender NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1. | E-Tender-15/24-25 /RfxNo. 7000031205 | Work of Garden Maintenance at 400 kV Nagothane s/s under 400 kV Nagothane Division. | Rs 2,74,313/- | 13.06.24 up to 16:00hrs |
| 2. | E-Tender-14/ 24-25 / Rfx No. 7000031297 | supply of 220 kV & 400 kV Discharge Rod at 400 KV Nagothane Substation under 400 KV R.S. O&M Division, Nagothane | Rs 2,05,320/- | 14.06.24 up to 16:00hrs |

EMD fee Rs. 5000/- & Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** Contact Person: MITESH GOYAL Mob No. 9461456635 Email ID: **ee7230@mahatransco.in** Note: All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
**EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM E –TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/ Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O&M ) /DIVN/MHD /Tech/E-Tender-19/ 2024-25 Dtd.07.06.2024 RFX No.7000031383 | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for hiring of LMV Jeep Type ( i.e. Mahindra Xylo, Mahindra Bolero, Mahindra TUV, TATA Sumo Gold or similar type etc) services along with fuel and driver at 220 kV Mahad Substation under EHV (O&M) Division Mahad For the year 2024-25. | **Rs.5,80,684/- including GST)** |
| 2. | **Tender No:-** EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/Tech/ E-Tender-20/2024-25 Dtd.07.06.2024 RFX No.7000031385 | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for hiring of LMV Jeep Type ( i.e. Mahindra Xylo, Mahindra Bolero, Mahindra TUV, TATA Sumo Gold or similar type etc) services along with fuel and driver at 100 kV Roha Substation under EHV (O&M) | **Rs.5,80,684/- including GST)** |
| 3. | **Tender No:-** EE/EHV (O&M ) /DIVN/MHD/Tech/ E-Tender-21/2024-25 Dtd.07.06.2024 RFX No.7000031386 | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for hiring of LMV Jeep Type ( i.e. Mahindra Xylo, Mahindra Bolero, Mahindra TUV, TATA Sumo Gold or similar type etc) services along with fuel and driver at 100 kV Mhasala Substation under EHV (O&M) Division Mahad For the year 2024-25. | **Rs.5,80,684/- including GST)** |
| 4. | **Tender No:-** EE/EHV (O&M ) /DIVN/MHD/Tech/ E-Tender-22/2024-25 Dtd.07.06.2024 RFX No.7000031049 | **Sub:-**Invitation of SRM E-Tender for providing Housekeeping Services at various premises under EHV (O&M) Dn. Office Mahad | **Rs.7,81,084/- (including GST+1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.

Bid submission is from 07.06.2024 @ 00:00 hrs to 13.06.2024 @23:59Hrs for above tender for further details visit our website:-**https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

Note:All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

~Sd~
**Executive Engineer, EHV(O&M) Dn., Mahad**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## अलिबाग को-ऑप अर्बन बँक लि.
### अलिबाग-रायगड
### सूचना

बँकेचे सेव्हींग/करंट खातेदारांस कळविणेत येते की, ज्या खातेदारांनी आपल्या खात्यामध्ये दोन किंवा अधिक वर्ष खात्यामध्ये व्यवहार केलेला नाही अशा खातेदारांनी आपल्या खात्यामध्ये व्यवहार करून आपले खाते ऑपरेटिव्ह करावे. तसेच खातेदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आपले अद्यावत मोबाईल क्रमांकाची बँकेकडे नोंद करावी, जेणेकरून त्यांना एसएमएस द्वारे मेसेज पाठविणे सोयीचे होईल.

कृपया अधिक माहितीसाठी संबंधित शाखा व्यवस्थापक यांचेशी संपर्क साधावा.

कृपया सहकार्य करावे.

सही/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि. करीता

दिनांक ०७/०६/२०२४

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी श्री. गजानन मालु थोरवे यांचेसोबत चालु आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्याची आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मिळकतीचे वर्णन**
**जिल्हा परिषद रायगड, दुय्यम निबंधक सो. कर्जत, जि. रायगड**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे. आर | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| पोसरी | ७१/६ | ०-०६-०० | ०.०५ |
| ता. कर्जत | ७२/३ | ०-०५-०० | ०.०५ |

सदरील मिळकती या जाहीर नोटीसीचा विषय आहेत.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क, कुळअखत्यारपत्र आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. प्रथमेश अरुण पाटील**
जिल्हा व सत्र न्यायालय, रायगड-अलिबाग
रुम. नं. ५, सागर दर्शन प्लाझा बिल्डिंग,
समाधान हॉटेलसमोर, कलेक्टर ऑफिसजवळ,
रामनाथ रोड, अलिबाग. ४०२ २०१
मो. ८००७८५५४५५/९९२१५५०५९५

## ग्रुप ग्रामपंचायत कडापे ता. माणगाव, जि. रायगड
## निविदा सूचना

ग्रुप ग्रामपंचायत कडापे, ता.माणगाव यांजकडून खालील कामाकरीता जास्तीत जास्त नोंदणीकृत ठेकेदारांकडून अल्प मुदतीची निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | योजनेचे | निविदा सादर करण्याची | | | कोरे निविदा फॉर्म फी | १% इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अंतिम तारीख | वेळ | ठिकाण | | |
| १ | शेरद येथील विहिरीला संरक्षण भिंत बांधणे | १००००० | ६ महिने | १५ वा वित्त आयोग | १२/०६/२०२४ | स.१०.००वा | ग्रा.पं.कडापे | १००/- | १००० |
| २ | कडापे येथील पाण्याचा आडातील गाळ काढून बांधकाम करणे | ८७९५० | ६ महिने | १५ वा वित्त आयोग | १२/०६/२०२४ | स.१०.००वा | ग्रा.पं.कडापे | १००/- | ८७९ |
| ३ | पिण्याचे पाण्याचे स्त्रोताचे क्लोरीनीकरण करणे | ५०००० | ६ महिने | १५ वा वित्त आयोग | १२/०६/२०२४ | स.१०.००वा | ग्रा.पं.कडापे | १००/- | ५०० |
| ४ | मंदिरापासून ते सुरेश उमाजी मढवी यांच्या घरापर्यंत रस्ता करणे. | १०४१२८ | ६ महिने | १५ वा वित्त आयोग | १२/०६/२०२४ | स.१०.००वा | ग्रा.पं.कडापे | १००/- | १०४१ |
| ५ | बांदलवाडी शाळेसाठी व उपकेंद्र कडापेसाठी साहित्य खरेदी करणे. | ५०००० | ६ महिने | १५ वा वित्त आयोग | १२/०६/२०२४ | स.१०.००वा | ग्रा.पं.कडापे | १००/- | ५०० |
| ६ | बांदळवाडी शाळेस शौचालय दुरूस्ती करणे | ७०००० | ६ महिने | १५ वा वित्त आयोग | १२/०६/२०२४ | स.१०.००वा | ग्रा.पं.कडापे | १००/- | ७०० |

**अटी व शर्ती:-** १) कामाचे अंदाजपत्रक व आराखडे कार्यालयीनी वेळेत पहावयास मिळतील आवश्यक असलेस फी भरून त्याची प्रत उपलब्ध केली जाईल.
२)अंतिम तारखेस दिनांक : १२/०६/२०२४ रोजी सायंकाळी १०.०० नंतर विचारात घेतल्या जाणार नाहीत.
३)प्राप्त निविदा दिनांक : १२/०६/२०२४ दुपारी ११.३० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थितांच्या समक्ष मा.सरपंच यांच्या हस्ते उघडण्यात येतील.
४)कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणते ही कारण न देता रद्द करणेचा अधिकार मा.सरपंच यांना राखून ठेवला आहे.
५)प्रत्येक देयकातून आयकर व उपकराची कपात केली जाईल, तसेच सुरक्षा अनामत व शासन नियमाप्रमाणे इतर रक्कम कपात केली जाईल.
६)पंचायत समिती तांत्रिक अधिकारी व ग्रामपंचायतीचे सदस्य यांचे मार्गदर्शनाखाली व देखरेखीखाली काम करणेचे असून काम समाधानकारक नसेल तर त्यात स्थितीत थांबवून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवलेला आहे.

सही/-
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत कडापे**
**मु.कडापे ता.माणगांव जि.रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत कडापे**
**मु.कडापे ता.माणगांव जि.रायगड**

## शिक्षक पाहिजेत
### फजंदार एज्युकेशन ट्रस्ट, वहुर, संचलित

हाजी आली आदम अनवारे हायस्कूल, वावे, ता. पोलादपूर, जि. रायगड
अनुदानित शाळेसाठी
खालील पात्रतेचे शिक्षक पाहिजेत.
१. बी.ए.बी.एड. (इंग्रजी)- (उर्दू माध्यम)- पद- १ (शिक्षण सेवक)
उमेदवारांनी अर्ज व योग्य त्या कागदपत्रांसह दिनांक : १०/०६/२०२४ (सोमवार) रोजी समक्ष मुलाखतीस सकाळी १०.०० ते १.०० या वेळेत संस्थेच्या कार्यालयात हजर रहावेत.

सही/-
**प्र. मुख्याध्यापक**
हाजी अली आदम अनवारे हायस्कूल
वावे, ता. पोलादपूर, जि. रायगड

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे इंद्रपै, ता.अलिबाग येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्रीम.सीमा ललित कनकाटे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| इंद्रपै | ५ | ०-१९-३० | ४.०२ |
| | | पो. ख. ०-०२-७० | |
| | | ०-२२-०० | |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. ०८/०६/२०२४

**ॲड. विधान अरविंद पाटील**
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

## जाहीर सूचना

महाराष्ट्र सरकार, पर्यावरण विभाग खोली क्र २१७, दुसरा मजला मंत्रालय मुंबई - ४०० ०३२ यांनी त्यांचा पत्र क्र SIA/MH/MIN/२८७००८/२०२२ दिनांक ४ ऑगस्ट २०२२ द्वारे श्रीम. अरुणा संतोष भोईर रा. तमनाथ, ता. कर्जत जि. रायगड प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक परवानगी दिली आहे.

सदर पर्यावरण विषय परवानगीच्या प्रती आपल्या माहितीसाठी महाराष्ट्र शासन पर्यावरण विभागाच्या पुढील संकेतस्थळावर पाहू शकता.

http://parivesh.nic.in

सही/-
**श्रीम. अरुणा संतोष भोईर**
रा. तमनाथ, ता. कर्जत, जि. रायगड.

## जाहीर सूचना

महाराष्ट्र सरकार, पर्यावरण विभाग खोली क्र २१७, दुसरा मजला मंत्रालय मुंबई - ४०० ०३२ यांनी त्यांचा पत्र क्र SIA/MH/MIN/४१२६७५/२०२३ दिनांक ६ जानेवारी २०२३ द्वारे श्रीमती. अरुणा संतोष भोईर रा. तमनाथ, ता. कर्जत जि.रायगड प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक परवानगी दिली आहे.

सदर पर्यावरण विषय परवानगीच्या प्रती आपल्या माहितीसाठी महाराष्ट्र शासन पर्यावरण विभागाच्या पुढील संकेतस्थळावर पाहू शकता.

http://parivesh.nic.in

सही/-
**श्रीमती. अरुणा संतोष भोईर**
**रा. तमनाथ, ता. कर्जत, जि. रायगड.**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक विवेक सिताराम मंडावळे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे - गौरकामत तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ४७/१/अ | ०-२०-०० हे आर पॉ | ३-३२ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०८/०६/२०२४

**ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
ॲड. वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक मयुर शरद लाड यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे- जांभिवली, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग / सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ४८/१/ब/२ | ०-२३-८० हे आर पॉ | ०-२३ |


या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी- विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०८/०६/२०२४

**ॲड. निलेश कान्हु मोरे मोबा.** ९८२२६९११०९
ॲड. वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे पाळांबे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. बाळाराम बाबाजी कदम, २) श्री. भिकाजी बाळाराम कदम व ३) सौ. अस्मिता अशोक घोगले, ४) सौ. अंजली अजित सितप व ७) सौ. दिपीका दिपक पवार यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| पाळांबे | ३२/२अ/१ | ०-५२-५० | १०.२५ |
| | | पो. ख.०-१७-३० | |
| | | एकूण ०-६९-८० | |

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील विकणेचा असून ती त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ०८/०६/२०२४

सही /-
**ॲड. माधवी नारायण ठाकूर.**
सी- ३०१, 'क्लिफ हेवन'
को. ऑप. हा. सोसायटी,
स्टेट बँक ऑफ इंडियाच्या बाजूला,
कोर्ट रोड, अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. दुर्गेश श्रीकांत बोरकर २) सौ. संचिता दुर्गेश बोरकर दोघेही रा. ३१२-३१३, बी विंग, श्रीहरी बिल्डींग, एस. अे. पालव मार्ग, शिंदे वाडी, दादर (पूर्व) मुंबई ४०००१४ यांचे कडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे. आर | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| वढाव खुर्द, ता. अलिबाग | १०७/१/२ | ०-२२-५ | ५-८० |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून (१५) पंधरा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दि. ०७/०६/२०२४

सही/-
**ॲड. आसावरी सु. घरत**
मु. पो. वरसोली, अलिबाग
अलिबाग - रायगड

**महाराष्ट्र शासन**
**महसुल व वनविभाग**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय, तळा जि. रायगड**
**दुरध्वनी क्रमांक -०२१४०-२६९३१७ फॅक्स-२६९०४२**
Email ID -tahasiltala@gmail.com

क्र. प्रशासन कात-५/जन्म-मृत्यू/जाहिर नोटीस/१७३४/२०२४ दि.०५/०६/२०२४

## जाहिर नोटीस मसुदा

१. श्री. विठोबा नारायण गोळे — अर्जदार
रा. बेलघर, ता. तळा जि. रायगड

विरुध्द

१. निबंधक जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी, — सामनेवाला
ग्रुप ग्रामपंचायत चरई खुर्द, ता. तळा जि. रायगड

तमाम जनतेस या जाहिर नोटीस अन्वये कळविण्यात येते की,सदरहू अर्जदार यांनी त्यांचे वडील कै. नारायण विठू गोळे यांचा मृत्यू दि. २१/१०/१९९५ रोजी मौजे बेलघर, ता. तळा, जि. रायगड येथे झाला असून त्यांचे मृत्यूची नोंद सामनेवाल्यांचे कार्यलयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दि.२२/०५/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचे वडील कै. नारायण विठू गोळे यांचा मृत्यू दि.२१/१०/१९९५ रोजी मौजे बेलघर येथे झाला असल्याचे घोषीत करुन मृत्यू दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे.न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदार कै. नारायण विठू गोळे यांचा मृत्यू दि.२१/१०/१९९५ रोजी मौजे बेलघर येथे मयत झाले असल्याचे गृहित धरुन सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०५/०६/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

सही/-
**(स्वाती पाटील)**
**कार्यकारी दंडाधिकारी तळा**




**कृषीवल** हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)